कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५
किंमत ४ ₹

## टेंबरे येथे बिबट्याची दहशत

**वेनगाव** : कर्जत तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्याच्या पायथ्याशी असणाऱ्या टेंबरे गावातील शेतकऱ्याच्या गुरांवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात गायीचे वासरू ठार मारले आहे. त्यामुळे सध्या या गावात भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, घटना घडल्यानंतर शुक्रवारी दुपारी वन विभागाचे कर्मचारी पंचनामा करण्यासाठी पोहोचले. टेंबरे येथील हरिश्चंद्र धर्मा निलदे हे शेतकरी आपल्याजवळ असणाऱ्या चार गायी, दोन बैल, दोन वासरे घेऊन रोजच्या प्रमाणे गावाशेजारी असणाऱ्या रानात सकाळच्या दरम्यान चरण्यासाठी घेऊन गेले होते. गुरुवारी दुपारच्या सुमारास बिबट्याने त्याच्या गुरांवर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात गायीचे वासरू ठार पान २ वर

## खारघरच्या कार्यक्रमात अल्पवयीनांना दारू?

पनवेल : खारघर शहरात २२ आणि २३ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'लोरिंग लाऊड इंडिया' कार्यक्रमात उघडपणे दारू विक्रीला परवानगी देण्यात आल्याच्या विरोधात स्थानिक नागरिक, विविध संस्था आणि संघर्ष समित्यांनी आधीपासूनच तीव्र निषेधाची भूमिका मांडली होती. कार्यक्रमात दारू व अमली पदार्थांचे खुले वितरण होऊ नये, अशी ठाम मागणीही प्रशासनाकडे करण्यात आली होती. तथापि, सर्व चेतावण्यांकडे दुर्लक्ष करत कार्यक्रमात अल्पवयीनांनाकेवळ १३ वर्षांच्या मुलांना देखील दारू दिल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. काही मुलांना अतिरिक्त दारू सेवन आणि संशयित पान २ वर

### वेधक

## खंडोबाची मूर्ती लंपास

**रायगड** : अलिबाग तालुक्यातील साखर आक्षीमधील गणपती मंदिरातील खंडोबा देवाच्या तीन चांदीच्या मूर्ती लंपास करण्यात आल्या. कोळी समाजाचे कुलदैवत असलेल्या देवाच्या मूर्ती चोरीला गेल्याने नाराजीचे सूर उमटले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आक्षी साखर येथे गणपती मंदिर आहे. या मंदिरामध्ये कोळी समाजाचे कुलदैवत असलेल्या खंडोबाच्या चांदीच्या मूर्ती होत्या. २० नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी मंदिरातील कुलदैवतांच्या तीन मूर्ती लंपास केल्या. ४५ हजारांचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पंकजा मुंडेंच्या पीएवर गुन्हा दाखल

मुंबई : लग्नाला अवघे नऊ-दहा महिने झालेले असताना अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉ. गौरी पालवे-गर्जे यांनी आपलं आयुष्य संपवलं. अनंत गर्जे हे गेल्या अनेक वर्षांपासून मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहात आहेत. अनंत यांचे दुसऱ्या मुलीशी संबंध असल्याचे कळाल्यानंतर डॉ. गौरी यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले, असे कळते. पोलिसांनी या प्रकरणात डॉ. गौरी यांचे पती अनंत गर्जे, नणंद शीतल गर्जे आणि दीर अजय गर्जे या तिघांवर वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गौरीच्या वडिलांनी अनंत गर्जेवर अनेक आरोप केले आहेत.

## १२ वर्षीय मुलीची आत्महत्या

**पनवेल** : शाळेतील गॅदरिंगचा कार्यक्रम पाहण्यासाठी लहान भावाने टीव्हीचा रिमोट न दिल्यामुळे झालेल्या वादातून १२ वर्षीय मुलीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही मन हेलावणारी घटना पनवेल येथील आसुडगांव परिसरात घडली. माही उर्फ अंजली ओमप्रकाश गुप्ता (१२) असे या मृत मुलीचे नाव आहे. आसुडगाव, सेक्टर-५ मध्ये राहणारी माही गुप्ता तिच्या आई-वडील आणि लहान भावासह राहात होती. माहीला टीव्हीवर तिच्या शाळेचा गॅदरिंगचा कार्यक्रम पाहायचा होता. त्यासाठी तिने लहान भावाकडे टीव्हीचा रिमोट मागितला. पान २ वर

# 5235 आंबा बागायतदारांना विमा कंपनीचा ठेंगा



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे १७ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र आहे. जिल्ह्यामध्ये ५६ हजार आंबा उत्पादक शेतकरी आहेत. जिल्ह्यातील पाच हजार २३५ शेतकऱ्यांनी विमा उतरविला आहे. मागील वर्षाचा आंबा हंगाम संपून सहा महिन्यांचा कालावधी लोटला, तरीदेखील कंपनीकडून रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळालेली नाही.

ही बाब महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक नुकतीच घेण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना विम्याचा परतावा तात्काळ देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. परतावा देण्यास चालढकलपणा करणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जावळे यांनी दिले आहेत.

### रायगडातील बागायतदारांवर अन्याय

रायगड जिल्ह्यामध्ये सुमारे १७ हजार हेक्टर आंब्याचे क्षेत्र आहे. जिल्ह्यामध्ये ५६ हजार आंबा उत्पादक शेतकरी आहेत. २०२१ ते २०२४ पर्यंत रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्याच्या तुलनेने चारपट प्रिमिअम होता. सध्या तो दुप्पट आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतकरी उदासीन आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील पाच हजार २३५ शेतकऱ्यांनी विमा उतरविला. मात्र, अजूनपर्यंत त्यांना नुकसानभरपाई मिळाली नाही. जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच अन्याय होत आहे. तो दूर करण्यासाठी लवकरात लवकर भरपाई देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केली.

### ■ अन्यथा कंपनीच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा; जिल्हाधिकारी किशन जावळेंचे आदेश

पावसाने आंबा पिकावर विपरीत परिणाम झाला होता. त्यानंतर मेमध्ये पडलेल्या पावसाने बाजारात आलेल्या पिकाचे मोठे नुकसान झाले, मात्र नुकसानीच्या बदल्यात आंबा बागायतदारांना विम्यातील एक रुपयाचाही परतावा मिळालेला नाही. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात आहे. ही बाब महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिली. सुधारित प्रमाणकांनुसार, विम्याचा परतावा तात्काळ देण्याचे आदेश जिल्हाधिकारी जावळे यांनी युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीच्या राज्य व्यवस्थापकांना दिले. स्कायमेट प्रमाणकांचा वापर कंपनीने वेळोवेळी करावा. अचूक प्रमाणकांवर नुकसानभरपाई दिली नाही, तर संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्यात येतील, अशी सक्त ताकीद यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी दिली.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक शुक्रवारी (दि.२०) घेण्यात आली. पान २ वर

(छायाचित्र : समीर मालोदे)



# प्रभाग पाचमध्ये जोरदार प्रचार

### महाविकास आघाडीच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून जल्लोषात सुरु आहे. प्रभाग पाचमधील नगरसेवकपदाचे उमेदवार निवेदिता राजेंद्र वाघमारे आणि समीर मधुकर ठाकूर यांचा प्रचार रविवारी सायंकाळी शितोळी आळीसह वेगवेगळ्या परिसरात करण्यात आला. घरोघरी जाऊन मतदान करण्याचे आवाहन उमेदवारांनी केले. यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मतदारांकडून मिळत असल्याचे चित्र दिसून आले.

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष व नगरसेवकपदासह २१ जागांसाठी ही लढत होती. मात्र, प्रभाग दोनमधील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत नाईक यांची बिनविरोध निवड झाली. भाजपच्या उमेदवारांकडून माघार घेण्यात आली. त्यामुळे आता एक नगराध्यक्ष व १९ नगरसेवक अशा वीस जागांसाठी ही लढत होणार आहे. थेट नगराध्यक्षपदासाठी पान २ वर



● अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांचा अभीष्टचिंतन सोहळा शेतकरी भवनमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, माजी जि.प. अध्यक्ष सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, प्रदीप नाईक आदी उपस्थित होते.

# चित्रलेखा पाटील यांना मातृशोक

### कार्यकर्त्यांसह विविध क्षेत्रातील मंडळींनी घेतली सांत्वनपर भेट

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या तसेच कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील यांच्या मातोश्री स्वाती सतीश टकले यांचे सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास निधन झाले. निधनसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चित्रलेखा पाटील नाशिक येथून अलिबाग निवासस्थानी आल्यावर शनिवारी अलिबागसह रायगड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांची सांत्वनपर भेट घेतली.



स्वाती टकले या नाशिकमधील रहिवासी होत्या. नाशिकमधील सोन्याचे प्रसिद्ध व्यापारी असलेल्या टकले ज्वेलर्सच्या त्या मालकीण होत्या. गृहिणीबरोबरच त्या एक उत्तम व्यावसायिक होत्या. सोमवारी पहाटेच्या सुमारास त्यांचे निधन झाले. त्याच दिवशी दुपारी साडेतीनच्या सुमारास नाशिक येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील आदींसह राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मंडळी, नातेवाईकांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. स्वाती टकले यांच्या निधनाने टकले कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. दरम्यान, चित्रलेखा पाटील यांचे शेकापच्या असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नाशिक येथे प्रत्यक्ष भेटून सांत्वन केले होते. शनिवारी चित्रलेखा पाटील त्यांच्या अलिबाग-वेश्वी येथील निवासस्थानी आल्याचे समजताच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शेकापच्या असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सांत्वनपर भेट घेतली.

# जावयानेच केला सासूचा खून

### उरण पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील मोठेभोम येथील हिराबाई जनार्दन जोशी या ९० वर्षीय वयोवृद्ध महिलेचा संशयस्पद खून झाल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास घडली होती. याबाबत नातेवाईकांनी पडून मृत्यू झाल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात केली होती. मात्र, महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत आढळल्याने सुरुवातीपासूनच पोलिसांचा संशय अधिक बळावला होता. या महिलेच्या मृतदेहच्या शवविच्छेदनानंतर टणक वस्तूने जबर मारहाण करून हा खून असल्याचा संशय आला होता.

दरम्यान, उरण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील जोशी यांच्यासह स.पो.नि. सुनील केदार, पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड, हवालदार मच्छिंद्र कोळी यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवून महत्त्वाचे धागेदोरे शोधून काढीत या गुन्ह्यातील महत्त्वाचे पुरावे प्राप्त झाल्याने या महिलेचा जावई आरोपी सुरेश सावळाराम पाटील (४७) याला ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्याने खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीला तात्काळ अटक करून उरणच्या कनिष्ठ न्यायालयासमोर हजर केले असता, पुढील तपासाकामी आरोपीला २७ नोव्हेंबरपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी हिराबाई जोशी यांनी त्यांच्या जमीन विक्रीचा व्यवहार केला होता. त्यातील १५ लाख रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा झाले होते. त्यातील ६ लाख रुपये त्यांनी त्यांच्या पान २ वर

# 'आरडीसीसी'च्या शिरपेचात मानाचा तुरा

### 7000 कोटींचा व्यवसाय टप्पा यशस्वीरित्या पार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकारी बँकिंगची निर्माण केलेली राज्यातील ओळख अधिक दृढ करीत आपला व्यवसाय टप्पा ७००० कोटींच्या पुढे नेला आहे. असा व्यवसाय टप्पा पार करणाऱ्या राज्यातील महत्त्वाच्या बँकांमध्ये रायगड जिल्हा बँकेने आपले नाव नोंदविले आहे. विशेष म्हणजे, मार्च २०२५ च्या तुलनेत बँकेचा व्यवसाय तब्बल १३०० कोटींनी वाढलेला असून, यामध्ये बँकेच्या ठेवीमध्ये झालेली लक्षणीय वाढ हे प्रमुख कारण ठरले आहे.

बँकेने आपल्या सहामाही कामगिरीमध्ये क्यू आर कोड, आयएमपीएस, यूपीआय -आधारित सेवांवर भर दिल्यामुळे बँकेच्या सेव्हिंग आणि करंट ठेवीत सातत्याने वाढ होत आहे. शिवाय, सहकारी बँकिंगमधील सर्वाधिक विश्वासार्ह संस्था म्हणून पान २ वर




> "ग्राहक आणि सभासदांचे मनापासून आभार. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेली ही प्रगती म्हणजे संपूर्ण रायगडच्या विश्वासाची कमाई आहे."
> — जयंत पाटील, चेअरमन







# रेल्वे स्थानक प्रवेशद्वारावर फेरीवाल्यांचा कब्जा

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर खारघर रेल्वे स्थानकात बेकायदा फेरीवाल्याचा सुळसुळाट झाला असून, खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार असलेल्या मोकळ्या जागेत रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी अनधिकृतपणे व्यवसाय थाटला आहे. खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वार अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडलेले असतानाही रेल्वे स्थानकांवर कार्यरत असलेले रेल्वे पोलीस, लोहमार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आणि सिडको सुरक्षा रक्षक केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने प्रवाशीवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

खारघर रेल्वे स्थानकातून दररोज जवळपास सव्वा लाख प्रवाशी प्रवास करतात. त्यामुळे खारघर रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. खारघर रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावर रेडिमेड कपडे, खेळणी, मोबाईल कव्हर, भेळ आणि फळ विक्रेत्यांनी कब्जा केल्यामुळे रेल्वे प्रवाशांना गर्दीतून वाट काढत खारघर रेल्वे स्थानकात जाताना परतताना मार्ग काढावा लागत आहे.

एवढेच नव्हे तर दिव्यांग व्यक्तीला खारघर रेल्वे स्थानकात प्रवेश करता येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गावर फेरीवाल्यानी कब्जा केल्याचे चित्र दिसत आहे. ८ वर्षांपूर्वी मुंबईतील एल्फिस्टन आणि परेल रेल्वे स्थानक यांना जोडणाऱ्या पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीत काही प्रवाशांचा मृत्यू झाला होता.




> खारघर रेल्वे स्थानकात पोलीस पथक पाठवून खारघर रेल्वे स्थानक आणि प्रवेशद्वारावरील बेकायदा फेरीवाल्यांना हटविले जाईल.
> – विजय तायडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रेल्वे पोलीस ठाणे, पनवेल

या घटनेनंतर रेल्वे स्थानक परिसरात दीडशे मीटर परिक्षेत्रात फेरीवाल्यांना मुंबई उच्च न्यायालयाने मज्जाव केला होता.

अलीकडेच दिल्ली मेट्रो स्थानकालगत कार स्फोट झाल्यामुळे पोलीस यंत्रणा जागृत झाली आहे. खारघर रेल्वे स्थानकात अनधिकृत फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. सायंकाळी पाच नंतर खारघर रेल्वे स्थानकातून बाहेर पडताना प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

## खारघर येथे रोजगार मेळावा

। पनवेल । प्रतिनिधी ।

अतुल म्हात्रे ग्लोबल लर्निंग आणि रिसर्च सेंटर यांच्यातर्फे खारघर विभागातील युवक-युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे.

या मेळाव्यासाठी शैक्षणिक पात्रता आठवी ते पदवीधर, आयटीआय फिटर, वेल्डर, सीएनसी मेकॅनिस्ट, इलेक्ट्रिशन, डिप्लोमा इंजिनियर असणार आहे. यासाठी आधारकार्ड, पॅन कार्ड आवश्यक आहेत. सत्याग्रह कला, वाणिज्य-विज्ञान महाविद्यालय थारवाणी हेरिटेज, प्लॉट क्र. २४, सेक्टर-७, खारघर येथे मेळावा होणार आहे. या मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी केले आहे.

# बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत


। पनवेल । प्रतिनिधी ।

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती दिनानिमित्त तळोजा फेज २ येथील बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजमध्ये बी.ए. एल.एल.बी, एलएलबी, एलएलएमच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी पनवेल सेशन कोर्टाचे न्यायाधीश श्री. कोठलीकर, जिल्हा सरकारी वकील अलिबागचे ॲड. पवार, पनवेल कोर्टाचे सरकारी वकील ॲड. भोपी, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिनगारे, बबनदादा पाटील कॉलेज ऑफ फिजओथेरेपीचे प्राचार्य डॉ. मनोज अग्निहोत्री, बबनदादा पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे प्राचार्य सौरभ खेडेकर, एस.व्ही. सिनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. राहुल कांबळे, दि. इलाईट पब्लिक स्कूल स्टेट बोर्डचे प्राचार्या डॉ. अलका कळसी, दि. इलाईट पब्लिक स्कूल सी.बी.एस.इ शाळेच्या प्राचार्या डॉ. अर्थप्रिया काका, बी.के. पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री. गोंधळी, कै. कमलू पाटील माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. बोराटे, अ.बी. पाटील माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गोडबोले, कॉलेजचे सर्व विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष व शिवसेना उपनेते बबन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संचालक गणेश पाटील व संचालक कैलास पाटील, संचालक स्मित भोईर, सेवानिवृत्त प्राचार्य काकेकर, उपस्थित होते.




# उरणमध्ये आगीत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू



। उरण । प्रतिनिधी ।

उरणच्या बौद्धवाडा परिसरात १० नोव्हेंबरच्या मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील तिन्ही सदस्यांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे. नगरपालिका कर्मचारी रमेश शंकर कांबळे, पत्नी रजनी आणि मुलगी निकिता तिघेही गंभीर भाजले होते. उपचार सुरू असतानाच ११, १४ आणि १९ नोव्हेंबर रोजी तिघांनीही अखेरचा श्वास घेतला.

मासळी मार्केटच्या मागील बाजूस असलेल्या कांबळे कुटुंबाच्या घराला मध्यरात्री अचानक आग भडकली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे सांगितले जात असले, तरी परिसरातील ग्रामस्थांनी या घटनेमागे घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. ''ही साधी आग नाही; सखोल चौकशी व्हावी'' अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. या मृत्यूमुळे उरण हादरून गेले असून, पोलिसांनी तपास सुरू करावा, अशी नागरिकांकडून मागणी जोर धरत आहे.

### घातपाताचा संशय

# संविधान अमृतमहोत्सवानिमित्त उपक्रम

## ॥ उल्का महाजनांचा अंतिम आढावा ॥ आज पत्रकार परिषदेचे आयोजन

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

संतविचार, स्वराज्य आणि संविधानाचा संदर्भ घेऊन महाड येथील चवदार तळे ते मनुस्मृतीदहन क्रांतीभूमी महाड येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दि. २५ नोव्हेंबर रोजी तसेच शिवराजधानी किल्ले रायगडावर दि. २६ नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना मानवंदना, शिवशपथ आणि समतेचा काला उपक्रम संविधान अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यात येणार असल्याने शिवशंभूप्रेमी, वारकरी, कीर्तनकार, संविधानप्रेमी, युवक युवती, मायमाउली, विद्यार्थी-विद्यार्थिनी, विविध संघटना, पक्षांचे कार्यकर्ते व नागरिक बंधू भगिनींनी दि. २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी रायगड येथे शिवशंभू स्वराज्य मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या उल्काताई महाजन यांनी महाड येथे केले.



■ (छायाचित्र : शैलेश पालकर)

संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दि. २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी महाड आणि रायगड येथे होणाऱ्या मोहिमेचा अंतिम आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीप्रसंगी उल्का महाजन मार्गदर्शन करीत होत्या. यावेळी महाडचे सामाजिक कार्यकर्ते सुधीर शेठ, दीपक क्षीरसागर, विजया पाटेकर, चंद्रकांत गायकवाड, जाधव तसेच अन्य संविधानप्रेमी कार्यकर्ते उपस्थित होते.

महाड शहरात नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्याने प्रत्येकाने संविधान अमृतमहोत्सवी वर्धापनदिनी आचारसंहिता भंग होणार नाही याची काळजी बाळगण्याची आवश्यकता व्यक्त करीत सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी हॉटेल समृध्दी येथे सायंकाळी चार वाजता संपूर्ण उपक्रमाबाबत माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले असल्याचे यावेळी उल्का महाजन यांनी सांगितले.

शिवशंभू स्वराज्य मोहिमेत सोलापूरचे भारत जाधव महाराज, सांगलीचे कॉम्रेड धनाजी गुरव व कैलास देसाई, अहिल्यानगरचे ॲड. अरुण जाधव व जालिंदर घिगे, हिंगोलीचे नारायण गोरे महाराज, सातारा येथील सुहास फडतरे महाराज, कोल्हापूरचे अशोक शिरोळे, रायगडमधील शाहू देशमुख तसेच शिवशंभू प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य संघटनेचे हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# खारघरमध्ये वैदर्भियांचा स्नेहमीलन सोहळा

। पनवेल । प्रतिनिधी ।

नोकरी, व्यवसायानिमित्त आपापल्या गावांपासून शेकडो किलोमीटर दूर आलेल्या मुंबई आणि नवी मुंबईतील विदर्भवासियांचा यांचा खारघर येथे चौथा स्नेहमिलन सोहळा आपला विदर्भ सामाजिक-सांस्कृतिक संस्थातर्फे आयोजित करण्यात आला आहे. खारघर, सेक्टर-१२ येथे उत्कर्ष हॉल येथे २९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ ते रात्री १० दरम्यान सदर स्नेहमीलन सोहळा पार पडणार आहे.

चंद्रपूर, गडचिरोली ते बुलढाणापर्यंत पसरलेल्या विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील हजारो वैदर्भीय नवी मुंबई आणि मुंबईत राहात आहेत. मात्र, त्यांची प्रभावी संघटना नसल्याने वैदर्भियांचे सांस्कृतिक आणि इतर कार्यक्रम या परिसरात पार पडत नाही. त्यामुळे आपल्या गावांपासून खूप दूर आलेल्या मराठी माणसांना आपली बोली भाषा, आपल्या खाद्य आणि जीवनशैलींवर आधारित समारंभांची उणीव सतत भासत असते. सदर उणीव दूर करण्यासाठी या परिसरातील वैदर्भियांनी एकत्र येऊन आपला विदर्भ संघटना ३ वर्षांपूर्वी स्थापन केली आहे.

या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने वैदर्भियांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन आपला विदर्भ संस्थाचे अध्यक्ष ॲड. विजयकुमार कोहाड आणि सरचिटणीस प्रमोद चुंचूवार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कोहाड (९९६९२३८१५०) आणि सचिव-राजेंद्र नंदनकर (९९६७२२३८९०) या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थातर्फे करण्यात आले आहे.

## पान १ वरून

### प्रभाग पाचमध्ये जोरदार प्रचार

अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधुकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्विनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदीप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

महाविकास आघाडीमधील शेकाप, काँग्रेसच्या प्रभाग पाचमधील निवेदिता राजेंद्र वाघमारे, समीर मधुकर ठाकूर या उमेदवारांनी रविवारी (दि.२३) सायंकाळी अलिबागमध्ये प्रचार केला. महादेव आळी, लेले चौक, मारूती नाका, बालाजी नाका, शितोळी आळी आणि बाजारपेठ हद्दीत घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले. या प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांसह मतदारांकडूनदेखील उत्स्फूर्त प्रतिसाद महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मिळतानाचे चित्र दिसून येत आहे.

यावेळी अलिबाग नगरपालिकेच्या माजी नगरसेवक संजना कीर, विनोद सुर्वे, काँगेसचे नेते काका ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, जयेंद्र वाघमारे, प्रसाद थळे, राजेंद्र वाघमारे, मिलिंद जाधव, जगदीश जाधव, शैलेंद्र तांडेल, प्रशांत वाघमारे, प्रकाश पावसकर, संदीप शिवलकर, बंड्या पेरेकर, अजय करंबत, रुपा वाघमारे, ललिता गायकवाड, आकाश पाटील, प्रसाद थळे, सलीम तांडेल, मोरेश्वर भगत आदी महाविकास आघाडीतील शेकाप, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, तरुण मंडळी उपस्थित होते.

### विमा कंपनीचा ठेंगा

या बैठकीत महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल, सुप्रिया देशपांडे, राकेश जाधव, भरत साळुंखे, प्रफुल्ल खारपाटील, संतोष भोसले, सुनील कोंडाळकर, सीताराम कदम, अजित पाटील, पंकज जवके आदींसह जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, बँक ऑफ इंडियाचे विजयकुमार कुलकर्णी, कृषी विभागाचे सांख्यिकी अधिकारी शतानंद कोमटे आदी उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत मोकल यांनी, मागील वर्षाचा आंबा हंगाम संपून सहा महिन्यांचा कालावधी लोटला, तरीदेखील कंपनीकडून रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळाली नाही. दिवाळीपूर्वी निश्चित केलेली विमा रक्कम ही स्कायमेटकडून प्राप्त डाटापेक्षा कमी होती. जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे नव्याने पुनर्तपासणी करून अचूक विमा रक्कम निश्चित करण्यात यावी. यासाठी कंपनीला शासनामार्फत १७ नोव्हेंबरला पत्र पाठविण्यात आले आहे. तरीदेखील कंपनीने अजूनपर्यंत माहिती जमा केली नाही, ही बाब जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली. मोकल यांच्या तक्रारीची जिल्हाधिकारी जावळे यांनी तात्काळ दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, दुप्पट प्रीमिअम कमी करण्यात यावा, अशी सूचना विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिली.

जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई मिळेल, असा विश्वास आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी व्यक्त केला

### जावयानेच केला सासूचा खून

मुली व नातेवाईकांना दिले होते. तर, या महिलेच्या मृत्यूच्या दिवशी यातील रक्कम वाटण्याची बैठक होणार होती. त्यामुळे पैशाचा अधिक हव्यास असलेल्या जावयाने पैशाच्या वाटपावरूनच या वयोवृद्ध महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत करून खून केला असल्याचे समोर आले आहे. या खुनामध्ये आरोपी सुरेश पाटील याच्या साथीला आणखी कोण आहेत का? याचा शोध उरण पोलीस घेत आहेत.

### आरडीसीसीच्या शिरपेचात मानाचा तुरा

जिल्ह्याबाहेरील विश्वस्त संस्था, व्यापारी संघटना आणि सहकारी सोसायट्यांनीही बँकेच्या मुदतठेवीमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे.

यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी बँकेने डिजिटल सेवा विस्तार आणि सायबर सुरक्षा मजबूत करण्याकडे विशेष आणि तांत्रिक उन्नतीमुळे व्यवहारांची गती, सुरक्षितता आणि ग्राहकांचा अनुभव अधिक सुधारला आहे याबाबत माहिती दिली, तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांनीही डिजिटल पद्धतींचा स्वीकार वाढवल्याने बँकेच्या ठेवीत व व्यवहारात नैसर्गिक वाढ होत आहे, असे प्रतिपादन केले.

बँकेने एनपीए नियंत्रण आणि कर्ज प्रक्रियेतील पारदर्शकता यावरही प्राधान्याने काम केले असून, यामुळे बँकेवरील सार्वजनिक विश्वास अधिक दृढ झाला आहे. बँकेच्या संचालक मंडळाचा दैनंदिन कारभारातील सहभाग, निर्णयक्षम नेतृत्व आणि सातत्यपूर्ण देखरेख यामुळे बँकेची एक नवी, सक्षम आणि आधुनिक प्रतिमा निर्माण होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार वर्तक यांनी या यशाबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले, ङ्गङ्घबँकेची वाढ ही फक्त आकड्यांपुरती मर्यादित नसून, ग्रामीण ग्राहकांच्या गरजांना प्रतिसाद देणाऱ्या आमच्या सेवा-तत्त्वज्ञानाची ही जमेची बाजू आहे. पुढील काळात तंत्रज्ञान, ग्राहक सेवा आणि वित्तीय शिस्त या तीनही आघाड्यांवर बँक आणखी मजबुतीने काम करणार आहे.

### टेंबरे येथे बिबट्याची दहशत

मारले आहे. या घटनेनंतर हरिश्चंद्र निलदे यांनी तात्काळ वनविभागाला कळवले. शुक्रवारी वनविभागाचे कर्मचारी येऊन बिबट्याच्या हल्ल्यात ठार मारलेल्या वासराचा पंचनामा केला. मागील दोन महिन्यांपूर्वी ही हरिश्चंद्र निलदे यांच्या दुसऱ्या एका गायीच्या वासराला बिबट्याने मारले होते. यामुळे शेतकरी हरिश्चंद्र निलदे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यांना तात्काळ नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात येत आहे. भीमाशंकर अभयारण्याच्या डोंगरालगत पायथ्याशी असणारे पेठ, आंबिवली, जांबरुख, शिंगढोळ, रजपे, धामणी आदी ठिकाणी बिबट्याचा वास्तव असल्याचे येथील ग्रामस्थांनी पाहिले असल्याचे बोलले जात आहे. वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

**सध्या बिबट्याच्या प्रजननाचा हंगाम सुरू आहे. ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळेस एकटे फिरू नये. आपल्या मुलांना एकटे सोडू नये, तसेच आपल्याजवळील पाळीव पशुंना मोकळे न ठेवता रात्रीच्या वेळेस बंदिस्त जागेत ठेवून सतर्क राहावे.**
**– समीर शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी, कर्जत पूर्व**

### खारघरच्या कार्यक्रमात अल्पवयीनांना दारू?

विषबाधेमुळे तात्काळ रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली, अशी माहिती स्थानिकांकडून मिळाली आहे.


या प्रकारामुळे खारघर परिसरातील जनमानसात प्रचंड संतापाची लाट उसळली असून, सर्व स्तरातील नागरिक, पालक, सामाजिक संस्था यांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे. कार्यक्रम आयोजकांचे ढिसाळ नियोजन आणि नियंत्रणयंत्रणांची बेफिकिरी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नागरिकांकडून संबंधित यंत्रणांवर तात्काळ कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. अल्पवयीनांना दारू कशी आणि कुणी दिली? मेडिकल इमर्जन्सी कशी निर्माण झाली? कार्यक्रमात सुरक्षा आणि कडक तपासणी का नव्हती? या सर्व मुद्द्यांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अशी स्पष्ट मागणी होत आहे.

दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरीत चौकशी सुरू न केल्यास अत्यंत गंभीर पडसाद उमटू शकतात, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

### १२ वर्षीय मुलीची आत्महत्या

मात्र, लहान भावाला दुसरा कार्यक्रम पाहायचा असल्याने त्याने तिला रिमोट देण्यास स्पष्ट नकार दिला. या क्षुल्लक कारणावरुन बहीण-भावामध्ये जोरदार वाद झाला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या माहीने रागाच्या भरात टोकाचे पाऊल उचलले. ती तात्काळ घरातील दुसऱ्या मजल्यावर गेली आणि तेथील छताच्या पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. काही वेळानंतर माहीची आई तिला पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर गेली असता, तिला माही गळफास घेतलेल्या स्थितीत आढळली. या हृदयद्रावक प्रकारानंतर माहीच्या आईने शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तात्काळ पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माहीला दाखलपूर्व मृत घोषित केले. खांदेश्वर पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, अवघ्या १२ वर्षांच्या मुलीने रागाच्या भरात इतके मोठे पाऊल उचलल्याने आसुडगाव परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेतर्फे व्याख्यान




। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण येथे फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेच्यावतीने व्याख्यानाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. यावेळी वन्यजीव अभ्यासक निकेतन ठाकूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पक्षी आणि पक्ष्यांचा अधिवास याविषयी सविस्तर माहिती दिली.

भारतात सुमारे १४०० अशा पक्ष्यांच्या प्रजाती आहेत. या प्रजाती मात्र आजच्या काळात पर्यावरणास गौण मानून मानवाच्या अतिहव्यासापोटी निसर्गाची अपरिमित हानी होत आहे. त्यात अनेक प्रजाती नष्ट होत चाललेल्या आहेत. दि. ५ ते १२ जानेवारीपर्यंत पक्षी सप्ताह साजरा केला जातो. पक्षी प्रजाती व त्यांचे अस्तित्व हा अतिशय ज्वलंत विषय आहे त्यासंबंधी त्यांची माहिती व पक्ष्यांचे संवर्धन ही काळाची गरज आहे. यासाठी फ्रेंड्स ऑफ नेचर(फॉन) उरणचे सदस्य व वन्यजीव अभ्यासक निकेतन ठाकूर यांचे आत्माराम ठाकूर मिशन संचलित जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आवरेमधील आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे, सचिव वामन ठाकूर, अलका ठाकूर, प्रसाद ठाकूर, सिंधू ठाकूर व आदिनाथ ठाकूर, रिना ठाकूर उपस्थित राहून फ्रेंड्स ऑफ नेचर फॉनचे कौतुक केले.



# रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। उरण । प्रतिनिधी ।

श्री अनिरुद्ध उपासना फाऊंडेशन, दिलासा मेडिकल ट्रस्ट व सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र उरण मुळेखंडतर्फे उरण नगरपालिका शाळा नंबर १, उरण शहर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सामाजिक बांधिलकी जपत आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरात एकूण १७६ रक्तदात्यांनी भाग घेतला. त्यामध्ये २३ रक्तदाते काही कारणास्तव रिजेक्ट करण्यात आले.जे रक्तदाते आले होते, त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करून आभार मानण्यात आले.एकंदरीत १५३ जणांनी रक्तदान केले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, मौजे बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. नरेश कान्हा मसणे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकसनासाठी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७७ | ३ | ०.३८.०० पो.ख. ०.०३.०० एकुण क्षेत्र ०.४१.०० यापैकी विकसनास दिलेले क्षेत्र ०.३१.०० | ०.५३ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, विकसन करार, बयाणा पावती, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपटटा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार विकसनकार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल विकसनाचे काम पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- १४८४, बाजारपेठ, रेल्वे स्टेशन जवळ, मु. पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
विकसनकार तर्फे ॲडव्होकेट
मो. ९८६०६२६२४६

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. मंगेश विष्णु पवार | २६/६ | खाता क्र. ९१८ मधील विकत घेतलेले एकुण क्षेत्र ००-२०-५८ हे.आर. पॉ. | ०-२१ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २४/११/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत,जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## नि|व|ड|क



### बल्लाळेश्वर देवस्थानकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची चाळण

**पाली/वाघोशी :** पाली येथील बल्लाळेश्वर देवस्थानाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालक व भाविकांना तीव्र गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावर मोठंमोठे खड्डे पडले असून डांबरीकरण उखडल्याने पालीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नगरपंचायतीने टोल नाका बसवून बाहेरून येणाऱ्या वाहनांकडून कर वसूल केला जातो. तरीदेखील पालीत मूलभूत सुविधा मळित नसल्याची नागरिकांची तीव्र नाराजी आहे. याच पार्श्वभूमीवर पालितील मयुर ठोंबरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकून प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला आहे. कर देऊनही रस्ते आणि शुद्ध पाणी मळित नसेल, तर नगरपंचायतीला कसला कर द्यायचा, असा थेट सवाल त्यांनी विचारला आहे. त्यांच्या या पोस्टला मोठ्या प्रमाणात नागरिकांचा प्रतिसाद मळित असून, लोकांनीही यासंदर्भात आपली नाराजी नोंदवायला सुरुवात केली आहे.



### विद्यार्थ्यांनी बनवल्या पळसाच्या पत्रावळ्या

**पाली/बेणसे :** सुधागड तालुक्यातील राजिप सिद्धेश्वर शाळेतील विद्यार्थ्यांना पत्रावळ तयार करण्याचे प्रात्यक्षिक नुकतेच देण्यात आले. दिवसेंदिवस वाढत चाललेला प्लास्टिकचा अतिवापर टाळावा व पर्यावरण संवर्धन व्हावे आणि ही पारंपारिक परंपरा जोपासावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपक्रमशील शिक्षक जनार्दन भिलारे यांनी प्रात्यक्षिक करून पत्रावळी कशी तयार केली जाते हे विद्यार्थ्यांना दाखविले व प्रत्यक्ष कृती करून घेतली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पळसाची पाने वेगळी करून मधल्या पानाच्या मागे दुसरे पान उलटे लावून घेतले त्यानंतर दुसरी चार पाने चारी बाजूला बांबू काडीने टाचून घेतली. अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक सुंदर पत्रावळ तयार केली.

### भिलजी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**अलिबाग :** संत निरंकारी मिशनच्या अलिबाग तालुक्यातील भिलजी येथील चॅरीटेबल फाऊंडेशनच्यावतीने रविवारी (दि.३०) सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत संत निरंकारी भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये अलिबाग येथील जिल्हा शासकीय रक्तपेढी मार्फत रक्तसंकलन होणार आहे. संत निरंकारी मंडळाचा रक्तदानाचा हा सामाजिक पैलू मनुष्यमात्राच्या मनामध्ये मानवतावादी भावनांना उद्योन्मुख करत आहे. त्यामुळे या रक्तदान शिबिरासाठी जास्तीत जास्त रक्तदात्यांनी उपस्थित राहून रक्तदान या महान मानवी कार्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संत निरंकारी मंडळाचे भिलजी शाखेचे मुखी सुरेश गावंड यांनी केले आहे.

### मोहोपाडा प्रबळजवळील रस्त्यावर अपघातांना आमंत्रण

**रसायनी :** दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा अचानक मैदानासमोर प्रबळ स्कूल असून या शाळेत शिकण्यासाठी विद्यार्थ्यांची रेलचेल सुरु असते. शाळेजवळ उभी असलेली दुचाकी, चारचाकी वाहने तसेच दुकांनाचे फलक रस्त्यावर आल्याने शाळेसमोरुन रस्ता ओलांडताना तारेवरची कसरत करुन रस्ता ओलांडावा लागत आहे. तसेच, रस्त्याला गतिरोधक नसल्याने वाहने जोरात चालवली जातात. अरुंद झालेला रस्ता आणि वाढलेली रहदारी यामुळे अपघात झाल्यास किंवा कोणाची जिवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. हा रस्ता ओलांडताना लहानमोठे अपघात होत असल्याने प्रबळ शाळेजवळ दोन्ही बाजूने नव्याने गतिरोधक बसवावेत. त्यामुळे वाहनांच्या वेगाला पायबंद बसेल. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने लक्ष न दिल्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आंदोलन करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी सांगितले.

# मालमत्ता कर वाढीला स्थगिती

## || नगरपंचायतचा जनहिताचा निर्णय || जनतेतून समाधान व्यक्त

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**मागील अनेक दिवसांपासून अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली नगरपंचायतने केलेल्या मालमत्ता कर वाढीविरोधात नागरिकांनी आंदोलन व निवेदन देऊन लोकचळवळ उभी केली होती. या अनुषंगाने पाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा नुकतीच नगरपंचायतीच्या सभागृहात पार पडली. यासभेत नगरपंचायतने लोकभावना लक्षात घेऊन सर्वानुमते सन २०२५-२६ साठी केलेली करावाढ अखेर स्थगित केली आहे.**




मागील काही दिवसांपासून पाली नगरपंचायतने मालमत्ता कर वाढीची घोषणा केली होती. त्यावर पालीकरांनी या कर वाढीविरोधात नागरिकांनी आंदोलन छेडले होते. त्यांनी याबाबत नगरपंचायत प्रशासनाला निवेदन देऊन लोकचळवळ उभी केली होती. या अनुषंगाने पाली नगरपंचायतने नुकतेच सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले हेते. या सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर, मुख्याधिकारी माधुरी मडके, सर्व नगरसेवक व संबंधित अधिकारी उपस्थित होते. या सभेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये सर्वाधिक महत्त्वाची चर्चा करवाढीच्या प्रस्तावावर केंद्रित होती. यावेळी नगरपंचायतने लोकभावना व नागरिकांची मागणी लक्षात घेऊन सन २०२५-२६ साठी केलेली करावाढ अखेर स्थगित केली आहे. या निर्णयामुळे पालीकरांना दिलासा मिळणार असून, नगरपंचायतीने जनतेच्या हिताचा विचार करून पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. या निर्णयामुळे पाली शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सर्व नगरसेवक पालीकरांच्या बाजूने ठामपणे उभे असून त्यांच्या हिताचा विचार करत असल्याचे सांगितले.

### जनतेच्या बाजूने ठामपणे उभे

नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत बोलताना नगराध्यक्ष पराग मेहता यांनी सांगितले की, यापूर्वी ३० डिसेंबर २०२४ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी करवाढ रद्द करण्याचा ठराव घेतला होता. मात्र, प्रशासनाने या ठरावावर अपील केल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर सुनावणी झाली आणि २५ मार्च रोजी करवाढी संदर्भात नगरपंचायतीने केलेला ठराव जिल्हा अधिकारी अलिबाग यांनी रद्द केल्यामुळे नाईलाजाने नगरपंचायतला कारवाढ तशीच ठेवावी लागली होती. त्यानंतर आता नगरपंचायतीने पालीकरांच्या हितासाठी पुन्हा एकदा करवाढीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. तसेच, पाली नगरपंचायतीतील सर्व नगरसेवक हे जनतेच्या बाजूने ठामपणे उभे आहेत आणि त्यांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घेत आहेत, असेही मेहता यांनी सांगितले.

> **“पालीकरांना मालमत्ता करवाढीपासून तूर्तास दिलासा मळिणार आहे. पाली-सुधागड संघर्ष संस्था व पालीमधील सुजाण नागरिकांनी केलेल्या आंदोलनाला यश मळिाले आहे. नगरपंचायत नगराध्यक्ष, उप नगराध्यक्ष, नगरसेवकांनी मालमत्ता करवाढ करण्यास तूर्तास एक वर्ष स्थगिती दिली आहे. हा लढा असाच सुरु राहील. आधी विकास मग करवाढ, ही मागणी ठाम आहे. नागरिकांनी दिलेला पाठिंबा आणि केलेले उत्स्फूर्त आंदोलन या मुळेच हे शक्य झाले आहे. पाली सुधागड संघर्ष संस्था आणि सुजाण नागरिक यांचे खुप खुप आभार.**
> **– कपिल पाटील, नागरिक, पाली”**

## ‘बँक ऑफ वर्ड’ उपक्रमाची अंमलबजावणी



### नवघर शाळेचा नावीन्यपूर्ण उपक्रम

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

आजच्या काळात मराठी शाळांपुढे इंग्रजी भाषेचे सर्वात मोठे आव्हान आहे. अनेक पालक, विद्यार्थी आणि सशाजातील घटक यांना वाटते की, इंग्रजी माध्यम म्हणजेच उज्ज्वल भवितव्याची गुरुकिल्ली असून मराठी माध्यम म्हणजे अधोगतीची शक्यता आहे. या चुकीच्या समजुतीमुळे अनेक मराठी शाळांमध्ये असुरक्षिततेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषद शाळा नवघर येथे इंग्रजी शिक्षणासाठी एक आगळावेगळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. शाळेतील उपशिक्षिका शीतल पाटील गेल्या सहा ते सात महिन्यांपासून ‘बँक ऑफ वर्ड’ नावाचा उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी शब्दसंपत्ती वाढत असून, स्पेलिंग पाठांतर, व्याख्या रचना आणि संवाद कौशल्य यामध्ये लक्षणीय सुधारणा होत आहे.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःहून एक कार्यसंघ तयार केला असून, बँकेच्या कार्यपद्धतीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याचे ‘शब्द खाते’ तयार करण्यात आले आहे. दररोज विद्यार्थ्यांकडून इंग्रजी शब्दांचे पाठांतर करून घेण्यात येते आणि त्याची नोंद त्यांच्या खात्यावर केली जाते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक स्पर्धा आणि नव्या शब्दांच्या अभ्यासाची उत्सुकता निर्माण झाली आहे.

## ‘नव्या जगाचे पालकत्व’ कार्यशाळा

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेत सोबती ट्रस्टने ‘नव्या जगाचे पालकत्व’ ही कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. तुषार पाटील आणि डॉ. नरेश पवार यांनी कृती, नाट्य आणि मनमोकळ्या संवादातून पालक आणि मुलांच्या भावना अगदी हळुवारपणे उलगडून दाखवल्या.




हा उपक्रम केवळ अनुभवासाठी नाही, तर आपल्या मुलांसोबत हातात हात घालून संवेदनशील, समजूतदार आणि प्रेमळ पालक म्हणून पुढे जाण्याची नवी सुरुवात ठरली. आपण सगळेजण मळिून मुलांसाठी सुरक्षित, प्रेमळ आणि समजून घेणारे जग घडवू. अशी भावना निर्माण करून पालकांना मुलांच्या समस्या व त्या समस्या सोडविण्यासाठी आपण आई-वडील म्हणून काय केले पाहिजे, यासाठी पालकांना बोलते करून त्यांच्या मनातील प्रश्नांना वाचा फोडून अनेक उदाहरणे देऊन शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी पेण एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू, सदस्या डॉ. नीता कदम, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, पालक सदस्य व पालक उपस्थित होते.

## परसबाग ठरली विकासाचे साधन

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियानात जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक संपादित रानवली येथील रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा परसबाग शालेय विकासाचे साधन ठरली. पावसाळ्यात शालेय बागेत काकडी, पडवळ, कारले, दुधी भोपळा, शिराळे, घोसाळे इ. भाजीपाला लागवड करण्यात आली होती. याकरिता पालक, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती व रानवली ग्रामपंचायतीचे सहकार्य लाभले. हिवाळ्यात वांगी, मिरची, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, पावटा, मटार, मुळा, गाजर, बीट, कोथिंबीर, पालक, मेथी, माठ या भाजीपाल्याची लागवड केली आहे. त्याचबरोबर शालेय बागेतील झेंडूची फुले ही खास आकर्षण ठरली आहेत. शालेय परिसरात लावलेली भाजी विद्यार्थ्यांच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेसाठी वापरली जाते आणि उर्वरित भाजीपाल्याची खरेदी पालक व ग्रामस्थ करतात. त्यातून मळिणारा निधीतून गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले जाते. उर्वरित निधीतून विद्यार्थ्यांसाठी लाठी-काठी प्रशिक्षण आयोजन केले गेले. या उपक्रमाला सरपंच सुरेश मांडवकर, समाजसेवक राजू जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा कृणाली अडखळे यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक भिकू पांगारकर, सहशिक्षक निलेश श्रीवर्धनकर व सहशिक्षिका मानसी माळवदे यांनी सहकार्य केले.



## महिलेचे सोन्याचे मंगळसूत्र खेचले

| पनवेल | प्रतिनिधी

पनवेलमधील एक ज्येष्ठ महिला पायी चालत जात असताना दोन दुचाकीस्वारांनी तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पसार झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रेयसी कर्वे (६७) असे पीडित महिलेचे नाव आहे. त्या पनवेल मधील विघ्नेश मेडिकल समोरील स्वामी नित्यानंद मार्गावरून पायी जात होत्या. त्यावेळी त्याठिकाणी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले आणि तेथून त्यांनी पलायन केले.

## बोर्ड परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन



| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील हाशिवरे हितवर्धक मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आणि वैजाळी इंग्रजी माध्यमीक शाळेतील इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी विषेश मार्गदर्शन वर्गाचे आयोजन शनिवारी (दि.२२) करण्यात आले होते. यावेळी डोंबिवली येथील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे उपयुक्त असे मार्गदर्शन दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना लाभले. हे आयोजन हाशिवरे हितवर्धक मंडळाचे सचिव अनिल मोकल यांच्या प्रयत्नातून करण्यात आले.

यावेळी उपस्थित दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना माधुरी लोलायकर, अतुल साठे, संजना करंजे, श्रेया पारेख, वैदेही लिमये, राम गवारे या शिक्षकांनी योग्य ते मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी हाशिवरे हितवर्धक मंडळाचे सचिव अनिल मोकल, सल्लागार सुबोध मोकल, प्राचार्य बी.डी. गायकवाड, पर्यवेक्षक प्रबळकर, अर्चना ठाकूर, म्हात्रे, भोईर, डॉ. वघाळे, मोरे, माने, कोळी, चांदनी ठोंबर,प्रतिक म्हात्रे आदी शिक्षक व २०० विद्यार्थी उपस्थित होते.

## बिर्ला कंपनीकडून जलशुद्धीकरण केंद्र



| रसायनी | प्रतिनिधी |

तुपगांव गावामध्ये बिर्ला कार्बन कंपनीकडून जलशुद्धीकरण केंद्रासाठी पिण्याच्या पाण्याचा फिल्टर प्लांट बसविण्यात आला. या कार्यासाठी गावातील समाजसेवक दिलीप साळुंखे, सचिन कालेकर, अविनाश दळवी यांनी प्रयत्न केले. जलशुद्धीकरण केंद्राचे उद्घाटन रविवारी (दि.२३) तुपगावचे सरपंच रवींद्र कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रोहिणी गुरव, कांता नागावकर, देविदास गुरव, मनोज गुरव, रमेश दळवी, कन्हैयालाल विश्वकर्मा, संजय गुरव, हनुमान गुरव, रचना गुरव, जनार्दन गुरव, मिलिंद शिंदे, अल्पेश दळवी आदी उपस्थित होते. या अगोदरही बिर्ला कंपनीच्या माध्यमातून गावामध्ये विद्यार्थ्यांसाठी बस स्टॅन्ड, स्वामी समर्थ मठ, शंकर मंदिर, मारुती मंदिर येथे सौर दिवे बसविण्यात आले आहेत.

### वावे परीसरातील तरूणांसह महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद

# ग्रामीण भागात कार चालविण्याचे प्रशिक्षण

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पुर्वी शहरी भागात कार प्रशिक्षण केंद्र होते. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शहराच्या ठिकाणी प्रशिक्षणाला येताना अडथळे येत होते. मात्र, आता ग्रामीण भागात कार चालविण्याचे प्रशिक्षण केंद्र सुरु झाल्याने प्रशिक्षणार्थींकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. अलिबाग तालुक्यातील वावे परिसरात श्री समर्थ कृपा मोटार ड्रायव्हींग स्कूलच्या माध्यमातून ६००हून अधिक प्रशिक्षणांनी धडे घेतले आहेत.




तालुक्यातील मल्याण येथील रहिवासी असलेले दिलीप बाळाराम कंटक यांनी वावे परिसरात श्री समर्थ कृपा ड्रायव्हींग स्कूल सुरू केले आहे. २०२०पासून सुरु झालेल्या या ड्रायव्हींग स्कूलच्या माध्यमातून आतापर्यंत ६०४ जणांना कार चालविण्याचे शिक्षण घेतले आहे. ग्रामीण भागात ड्रायव्हींग स्कूल सूरू झाल्याने अनेकांना प्रत्यक्ष कार चालविण्याचे धडे मिळत आहेत. यातून योग्य कार चालविण्याचे धडे देत असताना वाहतूकीच्या नियमांची माहितीदेखील देण्याचे काम कंटक यांच्याकडून केले जाते. वाहन चालवित असताना वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे, याची जाणीवदेखील ते त्यांच्या प्रशिक्षणार्थींना वेळोवेळी देत असतात. आतापर्यंत एक हजारहून अधिक जणांनी वाहन चालविण्याचे परवाने काढले आहेत.

सुरुवातीला एसटीमध्ये सेवा त्यानंतर काही मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये प्रशिक्षक म्हणून चालक प्रशिक्षक अशी सुरुवात केली. वीस वर्षांचा अनुभव घेऊन स्वतः व्यवसायात उतरून वावे सारख्या ग्रामीण भागामधील मुलांना किंवा ज्यांना वाहन चालविण्यासाठी शिकण्याची इच्छा आहे अशा अनेकांना त्यांनी प्रशिक्षण देऊन उत्तम चालक बनविण्याचा प्रयत्न केला आहे. वाहन चालविण्याचे धडे घेण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांचादेखील सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

अलिबाग तालुक्यातील वावे, बामणगाव, रामराज, सुडकोली, रेवदंडा, चौल, नागाव तसेच मुरुड तालुक्यातील साळाव, मिठेखार, चोरढे, कोर्लई, बोर्ली, काशीद या परिसरातील मंडळींकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे.

## जनजागृती शिबिरात ग्राहकांचा सहभाग

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील जनतेची कोणत्याही सायबर गुन्ह्यांमुळे फसवणूक होऊ नये आणि त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होऊ नये यासाठी दाखस्ता जनजागृती मोहीम कर्जत तालुक्यातील बँकांच्यावतीने राबविण्यात आली. उमरोली गावातील ग्रामस्थांनी या जनजगृती मोहिमेला मोठा सहभाग घेतला.

दक्षता जनजागृती सप्ताह निमित्ताने जनजगृती मोहीम तालुक्यातील उमरोली गावातील हनुमान मंदिरात राबविण्यात आला. यावेळी भ्रष्टाचार संदर्भात माहिती देण्यात आली. तसेच, आयडीबीआय बँकेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनी देखील या बल नागरिकांना जागृती निर्माण करून सतर्क राहण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा अल सोशल क्राइमकंट्रोल अँटी कॅरप्शन अर्गनायझेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे, बँक असिस्टान जनरल मॅनेजर राजू रंजन, ज्युनिअर असिस्टान मॅनेजर निशांत म्हैसने, क्लार्क वैभव क्षीरसागर, बँक कर्मचारी संभाजी रसाळ, रायगड जिल्हा सदस्य संतोष पवार, माजी सरपंच महादेव लोंगळे, माजी सरपंच लोंगले, नरेंद्र लोंगळे, सचिन लोंगळे, समीर लोंगळे, शिल्पा घारे, भावना घारे, माजी उप सरपंच गुलाब लोंगळे, परेश लोंगळे, गणेश लोंगळे, सुनीता बुंधाटे, रामचंद्र घारे, विकास घारे, प्रवीण घारे, दिलीप लोंगळे, सुलोचना घारे, स्वप्नाली लोंगळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी ज्ञानेश्वर साळोखे यांनी, आपण भ्रष्टाचार थांबवू शकतो ही आपल्या सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. दक्षता जनजागृती कार्यक्रमात बँकेचे होणारे गैरव्यवहार, मोबाईलवर येणारे ओटीपी, लक, इतरस्त व्यक्तीचे, कवा अनोळखी व्यक्ती, कंपन्यांचे कल यांपासून सावधानगी बाळगावी. आपली माहिती गोपनीय ठेवून आपण सतर्क जबाबदार नागरिक म्हणून आपल्या आजूबाजूच्या लोकांना ही माहितीद्वारे सतर्क राहण्याचे आवाहन केले पाहिजे. तर आयडीबीआय बँकेच्या माध्यमातून फ्री.के.वाय. सी. आणि झिरो बॅलन्समध्ये बँक खाते खोलण्यात आले. या दक्षता जनजागृती कार्यक्रमास गावातील सर्व नागरिक उपस्थित राहून सर्वांनी मिळून कोणत्याही सरकारी कामासाठी लाच न देण्याची शपथ घेऊन कार्यक्रमास सहभागी झाले.

# शालेय फॅक्टरीचे बळी

दिल्लीतील शौर्य पाटीलच्या आत्महत्येने सध्या सर्वत्र खळबळ उडाली आहे. शौर्यचे पालक मूळचे सांगली जिल्ह्यातले असून सध्या दिल्लीत वास्तव्याला असतात. तिथल्या प्रतिष्ठित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तो दहावीमध्ये शिकत होता. एका नृत्य कार्यक्रमाची प्रॅक्टिस चालू असताना तो पाय मुरगळून खाली पडला. त्याच्या शिक्षिका त्याला ओरडल्या. त्याने मुद्दामच पडल्याचे नाटक केले असे म्हणाल्या. त्यावर तो रडू लागला. तरीही दया न येऊन शिक्षिका म्हणाल्या की, तू कितीही नाटके केलीस तरी मला फरक पडणार नाही. यामुळे दुखावलेल्या शौर्य याने मेट्रो रेल्वे स्थानकात उंचावरून उडी मारून आत्महत्या केली. त्याच्या दप्तरात एक चिठ्ठी सापडली असून शिक्षिकेने अपमानास्पद शब्द वापरल्यामुळेच आपण जीव देत आहोत असे त्याने म्हटले आहे. याबद्दल त्याने आपल्या आईवडिलांची माफीही मागितली आहे. हा सर्वच प्रकार धक्कादायक आहे. आजकाल मुले घराइतकाच किंवा त्याहूनही अधिक वेळ शाळेत असतात. साहजिकच मुलांवर सर्वाधिक संस्कार होतात वा प्रभाव पडतात ते शाळेच्या वातावरणतच होत. बहुतेकदा शिक्षक हेच त्यांच्यासाठी रोल मॉडेल असतात. त्यांचे वागणे, त्यांचे बोलणे हे मुलांच्या जडणघडणीमध्ये अतिशय कळीचे ठरते. शिक्षकांनी सर्व मुलांसमोर केलेली तारीफ त्यांचे मनोबल उंचावते तर सर्वांसमोर केलेली हेटाळणी त्यांना खच्ची करते. शौर्यच्या बाबतीत हेच घडले असावे. शौर्य हा खोडकर असेल किंवा कदाचित थोडासा आळशीही असेल. त्याने पडण्याचे नाटकही केले असेल असे गृहित धरू. पण त्याबद्दल ओरडल्यानंतर जेव्हा तो रडू लागला तेव्हा शिक्षिकांनी थांबायला हवे होते. पण त्यांना भान राहिले नाही. त्यांनी त्याची आणखी निर्भत्सना केली. तिचा इतका परिणाम होईल याची कदाचित त्यांनी कल्पना केली नसेल. कदाचित हा ओरडण्याचा पहिलाच प्रकार नसेल. यापूर्वी अनेकदा असे घडले असेल. इतरांच्या बाबतही झाले असेल. पण एखाद्या मुलाने टोकाचे पाऊल उचलण्याचा हा पहिलाच प्रसंग असेल. पण याचा अर्थच असा की, संबंधित शिक्षिका व विद्यार्थी यांच्यात कोणत्याच प्रकारचा संवाद राहिलेला नव्हता. त्या मुलांकडे एखादे यंत्र म्हणूनच पाहत होत्या.

### शिक्षकांची दहशत

सध्याच्या काळात शाळा व महाविद्यालयांना कारखान्यांचे स्वरुप आले आहे. शहरांमध्ये जागेअभावी दोन-दोन पाळ्यांमध्ये शाळांचे वर्ग चालवले जातात. त्यातही कहर असा की, सर्वात छोट्या मुलांचे बालवर्ग अगदी सकाळी भरवले जातात. मध्यंतरी तत्कालीन राज्यपालांनी हे वर्ग दुपारी भरवले जावेत अशी सूचना केली. ती किती शाळांनी मनापासून अमलात आणली हे तपासायला हवे. एकेका वर्गात ९०-१०० मुले कोंबल्याचे दिसते. पोर्शन पुरा करणे हे एकमेव ध्येय ठेवून अनेक ठिकाणी काम केले जाते. त्यातच एक्टिव्हिटीजच्या नावाखाली अर्थहीन गोष्टींची भरमार असते. प्रोजेक्ट या नावाने जे काही असते ते मुले गुगल किंवा चॅट जीपीटी वापरून आंधळेपणाने उतरवून काढतात. शिक्षकांना हे प्रोजेक्ट पाहायला वा तपासायलाही वेळ नसतो. बहुतेकदा खानापूर्ती किंवा रकाने भरणे, अमुक इतके प्रोजेक्ट केले असे दाखवणे यालाच महत्व असते. यामुळे आनंददायी असे शिकणे फारच कमी ठिकाणी होते. त्यातच इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इंग्रजीत बोलण्याची सक्ती असते. ती नसेल तर हिंदीत बोलले जाते. पण कोणत्याही परिस्थितीत मातृभाषेत बोलू दिले जात नाही. ते गावठी समजले जाते. यामुळे शाळेत शिक्षक व विद्यार्थी यांच्यात चांगले नाते निर्माण होणे कमी कमी होत जाते. दिल्लीतल्या ज्या शाळेत शौर्य शिकत होता तशा शाळा म्हणजे तर आता वेगळीच संस्थाने झाली आहेत. तेथे प्रवेश मिळवण्यासाठी कायमच झुंबड असते. शिक्षणचालक, प्रिन्सिपल हे शिक्षकांपासून ते विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांशीच मुजोरीने वागतात. शौर्यला गेले आठ-दहा महिने शिक्षिकांचा त्रास होत होता व तो याबाबत सतत तक्रारी करीत होता. याबाबत पालक बोलू शकत नव्हते. कारण दहावीचे इंटर्नल परिक्षांचे वीस गुण शाळांच्या हातात असतात. तक्रार केली तर खुन्नस ठेवून शौर्यचे नुकसान केले जाऊ शकते अशी भीती पालकांना वाटत होती.

### संवादाचा अभाव

एकूणच शाळेच्या कारखान्यातील अनिर्बंध सत्तेने माजलेले चालक व शिक्षक आणि त्यांच्यापुढचे हतबल पालक असे चित्र या घटनेने समोर येते. यात शिक्षकांची काही बाजू असू शकेल. कामाचा रेटाच इतका प्रचंड असतो की, विद्यार्थ्यांची मनःस्थिती, त्याच्या घरची परिस्थिती वगैरेंबाबत सहानुभूतीने विचार करायला शिक्षकांनाही अवसर नसतो हे समजण्यासारखे आहे. मात्र याच्याच परिणामी शौर्यसारखा एखादा संवेदनशील मुलगा स्वतःचा जीव देऊ शकतो याचे भान निदान आता तरी या व्यवस्थेतील सर्वांनी ठेवायला हवे. शौर्यचा हा प्रकार दिल्लीत घडला व त्याला राष्ट्रीय माध्यमांनी प्रसिध्दी दिली. त्यामुळे निदान सर्वांसमोर ही घटना आली. अशा कित्येक घटना इतरत्र नेहमी घडत असतात. अलिकडेच वसईजवळच्या एका शाळेत सहावीत शिकणाऱ्या मुलीला ती उशिरा आली म्हणून १०० उठाबशा काढण्याची शिक्षा देण्यात आली. त्यामुळे अतिश्रम होऊन नंतर तिचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वी राजस्थानात नऊ वर्षांच्या मुलीने लैंगिक शैरेबाजीला कंटाळून शाळेतच वरच्या मजल्यावरून उडी टाकून जीव दिला. आपली शिक्षण व्यवस्था किती किडलेली आहे याची ही काही मोजकी उदाहरणे आहेत. याच व्यवस्थेतून आपले उद्याचे नागरिक घडत असतात. पण हे छोटे नागरिक असे निराश, आतल्या आत कुचंबणा होणारे, दुःखी व गप्प राहून अन्याय सहन करणारे असतील तर पुढची स्थिती भीषण आहे. शौर्यचेच उदाहरण घ्या. आपण कितीही तक्रारी केल्या तरी आपले पालक शिक्षकांना काहीही बोलू शकणार नाहीत व आपला छळ असाच चालू राहणार अशी एक असहायतेची भावना त्याच्यात निर्माण झाली असली पाहिजे. आपल्या दुःखाला वाचा फुटू शकत नाही व फोडूनही काही उपयोग नाही असा संदेश शौर्यला यातून मिळाला व त्याने टोकाचे पाऊल उचलले. आता याबाबत सुधारणा झाली नाही व शाळेने शौर्यचे प्रकरण दडपले तर शौर्यच्या बरोबरीच्या सर्व मुलांमध्ये एक कमालीची निराशा निर्माण होईल. पंधरा हे युवावस्थेत प्रवेश करण्याच्या उंबरठ्यावरचे वय आहे. तिथे असा निराशेचा व असहायतेचा दारुण अनुभव मुलांना आपल्या लाडक्या शाळेकडून व शिक्षकांकडून यावा हे फार भयंकर असेल. या निमित्ताने एकूणच आपल्या सर्व शाळांनी आत्मपरीक्षण करून विद्यार्थ्यांसोबत संवादाच्या अधिक जागा निर्माण करायला हव्यात. सतत अभ्यास, प्रोजेक्ट याविषयी न बोलता काही वेळ मनमोकळ्या गप्पा मारण्यासाठीही ठेवायला हवा. पालकांनीही मुलांना एकदा शाळेत अडकावले की आपण सुटलो अशी भावना न ठेवता मुलांशी सतत बोलायला हवे. अभ्यासात किंवा अन्य कशातही ते मागे पडत असतील तर त्यांना समजून घ्यायला हवे. मुले म्हणजे बैलगाडीचे बैल किंवा रेसकोर्सचे घोडे नव्हेत.

विचार

# चीनला फटका, दागिन्यांना झटका

***अर्थनगरीमध्ये सध्या संमिश्र वातावरण पहायला मिळत आहे. देशापुढील महत्वाचे आर्थिक प्रश्न सोडवले जात नाहीत, तोपर्यंत त्यात बदल होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीमध्ये अलिकडेच समोर आलेली लक्षवेधी बातमी म्हणजे चीन आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर आहे. दरम्यान, अमेरिकन निर्यात शुल्काचा भारतातील ज्वेलरी उद्योगाला फटका बसल्याचे दिसून आले. या महत्वाच्या बातम्यांचा हा खास वेध.***



**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये सध्या संमिश्र वातावरण पहायला मिळत आहे. देशापुढील महत्वाचे आर्थिक प्रश्न सोडवले जात नाहीत, तोपर्यंत त्यात बदल होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीमध्ये अलिकडेच समोर आलेली लक्षवेधी बातमी म्हणजे चीन आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर आहे. दरम्यान, अमेरिकन निर्यात शुल्काचा भारतातील ज्वेलरी उद्योगाला फटका बसल्याचे दिसून आले. याच सुमारास भारतीय खेळणी निर्यातदारांना वर्षभर चांगला व्यवसाय करता आला असला तरी आता परिस्थिती पालटत आहे.

जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला चीन आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसून येत आहे. ऑक्टोबरमध्ये जाहीर झालेल्या नवीन आकडेवारीमुळे चीनमध्येच नव्हे, तर जगभरातील आर्थिक विश्लेषकांना चिंता वाटली आहे. चीनचे कारखान्यांमधून होणारे उत्पादन आणि किरकोळ विक्री गेल्या वर्षातील सर्वात मंद गतीने वाढले आहेत. दशकांपासून विकास आणि प्रगतीचे एक चमकदार उदाहरण असलेल्या चीनवर आता सर्व बाजूंनी दबाव येत आहे. देशांतर्गत मागणी मंदावली आहे तर देशातील गुंतवणूक सातत्याने कमी होत आहे. दशकांपासून चीनकडे विकासासाठी दोन अतिशय सोपी आणि प्रभावी सुत्रे होती. पहिले म्हणजे मोठ्या कारखान्यांद्वारे जगभरात मोठ्या प्रमाणात निर्यात तर दुसरे, सरकारी तिजोरीतून निधी काढून देशात गुंतवणूक करणे; परंतु आता असे दिसते, की हे दोन्ही मार्ग चीनसाठी बंद झाले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला एक कडक संदेश दिला आहे, की तो त्याच्या वाढीसाठी आता केवळ जगातील सर्वात मोठ्या ग्राहक बाजारपेठेवर म्हणजेच अमेरिकेवर अवलंबून राहू शकत नाही. त्याच वेळी देशात नवीन औद्योगिक पार्क आणि वीज उपकेंद्रांच्या बांधकामाद्वारे वाढ साधणे कठीण होत चालले आहे. कारण चीनच्या एकूण औद्योगिक क्षमतेला आता मर्यादा येत आहे. म्हणूनच दरमहा जाहीर होणारा आर्थिक डेटा सुधारण्याऐवजी खराब होत असल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय सांख्यिकी ब्युरोने जाहीर केलेला डेटा निराशाजनक आहे. ऑक्टोबरमध्ये चीनचे औद्योगिक उत्पादन केवळ ४.९ टक्के दराने वाढले. सप्टेंबरमध्ये नोंदवलेल्या ६.५ टक्के वाढीपेक्षा हे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी आहे. ऑगस्ट २०२४ नंतरचा हा सर्वात कमकुवत आकडा आहे. किरकोळ विक्रीमध्येही केवळ २.९ टक्के वाढ झाली. हा आकडा २.८ टक्के या अंदाजापेक्षा थोडा जास्त असला, तरी इतका मंद वेग देशांतर्गत मागणीतील कमकुवतपणा लपवू शकत नाही. उदाहरणार्थ, चीनचा सर्वात मोठा आणि सर्वात प्रसिद्ध 'सिंगल्स डे शॉपिंग फेस्टिव्हल' अपेक्षेनुसार विक्री वाढवू शकला नाही. या उत्सवात ग्राहकांना किमती कमी आढळल्या, परंतु त्यांचा आत्मविश्वास कमकुवत राहिला. हे सूचित करते की ग्राहकांचे खिसे आता पूर्वीसारखे मजबूत राहिले नाहीत आणि ते खरेदी करण्यास कचरत आहेत. चीनची सर्वात मोठी चिंता म्हणजे त्याची निर्यात यंत्रसामग्री, जी आता पूर्वीसारखी चांगली कामगिरी करत नाही. ऑक्टोबरमध्ये चीनची निर्यात अचानक कोसळली. हे प्रामुख्याने अमेरिकन बाजारपेठेतील मंदी आणि तेथे लादलेल्या उच्च शुल्कामुळे होते. त्यामुळे मागणी कमी झाली. उत्पादकांनी अनेक महिन्यांपासून विकण्यायोग्य मालमत्ता जमा केली होती; परंतु आता त्यांना ती इतरत्र फायद्यात विकणे कठीण होत आहे. निर्यातच नाही तर कार बाजारावरही परिणाम झाला आहे. आठ महिन्यांच्या वाढीनंतर चीनच्या ऑटो विक्रीमध्ये अचानक घट झाली. ही घसरण आणखी चिंताजनक आहे कारण वर्षाचा शेवटचा तिमाही सामान्यतः कारविक्रीसाठी सर्वात मजबूत काळ मानला जातो.

गुंतवणूक आणि मालमत्ता क्षेत्रातील घसरण भीतीला आणखी बळकटी देत आहे. जानेवारी ते ऑक्टोबर दरम्यान, स्थिर मालमत्ता गुंतवणूक १.७ टक्क्यांनी घसरली. ती अपेक्षेपेक्षा खूपच कमकुवत आहे. चीनमधील गृहनिर्माण क्षेत्र सर्वात वाईट स्थितीत आहे. गेल्या वर्षभरात नवीन घरांच्या किमती सर्वात वेगाने घसरल्या आहेत. या सर्व आव्हानांमध्ये चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने नुकतीच पुढील पाच वर्षांसाठी आर्थिक दिशा निश्चित करण्यासाठी एक बैठक घेतली. त्यात देशांतर्गत वापर वाढवण्याचे आणि औद्योगिक पाया मजबूत करण्याचे आवाहन करण्यात आले; परंतु या सुधारणांची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण आणि राजकीय जोखमीने भरलेले आहे. अनेक अर्थतज्ज्ञांचा विश्वास आहे, की सरकार पुन्हा मोठ्या सार्वजनिक उपक्रमांना आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांना प्राधान्य देऊन लहान व्यवसाय आणि घरांना मागे ठेवू शकते. तज्ज्ञांनी इशारा दिला आहे, की देशांतर्गत मागणी, निर्यात आणि गुंतवणुकीतील कमकुवतपणा असाच राहिल्यास चीनला २०२६ पूर्वी मोठ्या आर्थिक सुधारणा किंवा मदत पॅकेज जाहीर करावे लागेल, अन्यथा ड्रॅगनचे विकास इंजिन कायमचे थांबू शकते.

आता बातमी भारतीय दागिने उद्योगाला बसलेल्या फटक्याची. ऑक्टोबर महिन्यात, परदेशात आणि स्थानिक बाजारात सोन्याच्या किमती विक्रमी पातळीवर पोहोचल्या. यामुळे दागिन्यांच्या किमती गगनाला भिडल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्कवाढीनेही महत्वाची भूमिका बजावली. यामुळे परदेशी बाजारपेठेत भारतीय रत्ने आणि दागिन्यांच्या मागणीत घट झाली. परिणामी, ऑक्टोबरमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत निर्यातीमध्ये ३१ टक्के घट झाली. जीजेईपीसी या उद्योग संघटनेच्या मते, ऑक्टोबरमध्ये भारताची रत्ने आणि दागिन्यांची निर्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत ३०.५७ टक्के कमी होऊन २१६८.०५ दशलक्ष डॉलर्स (१९,१७२.८९० कोटी रुपये) झाली. रत्ने आणि दागिने निर्यात प्रोत्साहन परिषदेने (जीजेईपीसी) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये या क्षेत्रातील एकूण निर्यात ३१२२.५२ दशलक्ष डॉलर्स (२६,२३७ कोटी रुपये) होती. जीजेईपीसीचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांनी स्पष्ट केले, की ऑक्टोबरमध्ये एकूण निर्यातीत घट प्रामुख्याने झाली. २७ ऑगस्टपूर्वीच बहुतेक उत्सवाचा साठा जमा झाला होता. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये मागणी कमी राहिली.

सोने आणि चांदीच्या निर्यातीत घट हे सोन्याच्या किमतीतील चढउतारांमुळे घडत आहे. तथापि, नोव्हेंबरमध्ये निर्यात पुन्हा वाढण्याची अपेक्षा आहे. कारण चीनी बाजारपेठ हळूहळू सुधारत असून इतर प्रमुख बाजारपेठांमध्ये ख्रिसमसची मागणी दिसून येईल. ऑक्टोबरमध्ये कट आणि पॉलिश केलेल्या हिऱ्यांची निर्यात २६.९७ टक्क्यांनी घसरून १,०२५.९९ दशलक्ष डॉलर्स (९,०७१.४१ कोटी रुपये) झाली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ती १,४०४.८५ दशलक्ष डॉलर्स (११,८०६.४५ कोटी रुपये) होती. ऑक्टोबरमध्ये पॉलिश केलेल्या आणि प्रयोगशाळेत तयार केलेल्या हिऱ्यांची निर्यातही ३४.९० टक्क्यांनी घसरून ८३४.४५ कोटी रुपये झाली. सोन्याच्या दागिन्यांच्या निर्यातीतही २८.४ टक्क्यांनी घट होऊन ती ७,५२०.३४ कोटी रुपये झाली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ९,९७५.१७ कोटी रुपये) होती.

दरम्यान एक लक्षवेधी बातमी समोर आली आहे. या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला भारतीय खेळणी निर्यातदारांना चांगला व्यवसाय दिसून येत होता. सणांसाठी सुरुवातीच्या शिपमेंट आणि अमेरिकन खरेदीदारांकडून आगाऊ खरेदीमुळे चांगली सुरुवात झाली. तथापि, आता नवीन ऑर्डर अचानक कमी झाल्या आहेत. अमेरिकेने लादलेला ५० टक्के कर हे त्याचे कारण आहे. एप्रिल ते ऑगस्ट या काळात मनोरंजन वस्तूंची निर्यात चार टक्क्यांनी वाढून १०१.९ दशलक्ष डॉलर्स झाली. एकूण खेळणी, खेळ आणि क्रीडा वस्तूंची निर्यात ८.९ टक्क्यांनी वाढून ३०२.६ दशलक्ष डॉलर्स झाली. अमेरिका या वस्तूंसाठी सर्वात मोठी बाजारपेठ राहिली आहे. एप्रिल-ऑगस्टमध्ये केवळ उत्सव आणि मनोरंजनाच्या वस्तूंची ६४.५ दशलक्ष डॉलर्स निर्यात झाली. ती मागील वर्षीच्या एकूण निर्यातीच्या ७८ टक्के आहे. फनस्कूल इंडियाचे सीईओ के. ए. शबीर म्हणाले, की अमेरिकेतील उत्सव हंगामासाठी शिपमेंट एप्रिलमध्ये सुरू होते. चीनी खेळण्यांवर जास्त शुल्क असल्याने या वर्षी खरेदीदारांनी लवकर ऑर्डर दिल्या. यामुळे पहिल्या सहामाहीमध्ये चांगली विक्री झाली. तथापि भारतावर पन्नास टक्के शुल्क लादण्यात आल्यानंतर, नवीन ऑर्डर थांबल्या. टॉय असोसिएशन ऑफ इंडियाचे कार्यकारी समिती सदस्य अमिताभ खरबंदा म्हणतात, की ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये येणाऱ्या पुढील उत्सवचक्रासाठी बुकिंग या वर्षी निम्मे झाले आहे. वाढत्या खर्चामुळे खेळण्यांचे आकार कमी होत असून पॅकेजिंग अधिक मूलभूत बनत आहे. दिल्लीतील एका निर्यातदाराने सांगितले की ग्राहक अधिक सवलतींची मागणी करत आहेत. त्या न दिल्यास व्यवसाय व्हिएतनामला जाईल.

# निवडणुकीच्या प्रचाराचा 'आधुनिक' अंदाज



**वैष्णवी वाडकर**

निवडणुक म्हटलं कि, 'प्रचार' हा शब्द सहज जोडला जातो. महाराष्ट्रभर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी जोरदार सुरु आहे. गेल्या काही वर्षांत ज्याप्रमाणे राजकीय क्षेत्रात झपाट्याने बदल होत गेले, त्याचप्रमाणे निवडणुक प्रचाराच्या पद्धतींमध्ये देखील बदल होत गेला. भारतात होत असणाऱ्या तांत्रिक प्रगतीने निवडणुक प्रचाराला नवे वळण दिले. पूर्वी पॅम्प्लेट्स, रॅली, मेळावा व मतदारांना भेटून प्रचार केला जायचा. मात्र, आजचा प्रचार हा पूर्णतः आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित होत चालला आहे. डिजिटल साधनांची शक्ती, सोशल मीडियाची पोहोच आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर या सगळ्यांनी प्रचाराचे समीकरणच बदलून टाकले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक पार पडण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार ऑक्टोबर महिन्यात नगरपरिषद निवडणुकांचे आरक्षण जाहीर करण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात नगरपरिषद निवडणुकांची तारीख जाहीर करण्यात आली. २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार व अखेर १० डिसेंबर रोजी निकाल जाहीर केला जाईल. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होताच विविध राजकीय पक्षांनी नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी उमेदवार जाहीर केले. १० ते १७ नोव्हेंबर दरम्यान उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली व छाननी होऊन २६ नोव्हेंबरला अंतिम उमेदवार जाहीर करण्यात आले. अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतर राजकीय पक्षांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली असून प्रचाराचा एक वेगळाच आधुनिक अंदाज पाहायला मिळत आहे.

१९९० च्या दशकात दूरदर्शनच्या आगमनाने, निवडणूक प्रचारात आधुनिक व एक आदर्श बदल दिसून येऊ लागला. त्यांनतर डिजिटल प्लॅटफफॉर्मचा प्रसार आणि फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप सारख्या सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मच्या शोधामुळे राजकीय संवाद साधण्याच्या पद्धतीत बदल होत गेला. सुरुवातीच्या काळात निवडणुकीचा प्रचार मोठ्या प्रमाणात जनसमुदाय, सार्वजनिक रॅली आणि प्रिंट मीडिया जाहिराती यासारख्या पारंपारिक पद्धतींवर अवलंबून होता. राजकीय पक्षांनी देशाच्या कानाकोपऱ्यातून प्रवास केला, मतदारांशी त्यांच्या दाराशी आणि मोठ्या प्रमाणात मेळाव्यांद्वारे थेट संवाद साधला. राजकीय पक्ष मेळावे, पॅम्प्लेट्स जाहिरातींद्वारे उमेदवारांना मतदान करण्याचे आव्हान करायचे. वर्तमानपत्रे आणि पत्रके यांसह दूरदर्शन, रेडिओने, प्रचाराचे संदेश आणि प्रचार जनतेपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, आता निवडणुक प्रचाराचेदेखील आधुनिकीकरण झाले आहे.

इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे ज्यापैकी बहुतेक तरुण आहेत. तरुणाईला देशाचे उज्वल भविष्य मानले जाते म्हणून राजकीय पक्षांच्या मते तरुणाईपर्यंत पोहोचणे सर्वाधिक महत्वाचे मानले जाते. त्यामुळे आजच्या काळात सोशल मिडिया हा प्रचाराचा सर्वात मोठा मंच बनला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, व्हॅट्सऍपद्वारे उमेदवार सतत स्वतःच्या कामांची माहिती देत आहेत. छोट्या व्हिडिओज, रील्स, पोस्ट्स आणि लाईव्ह येऊन ते थेट मतदारांशी संवाद साधतात. यामुळे तरुण मतदारांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे झाले आहे. एक व्हिडिओ व्हायरल झाला तर त्याचा प्रचाराला मोठा फायदा होतो.

डिजिटल जाहिरातींचाही प्रचारात अधिक वापर होऊ लागला आहे. मतदार कोणत्या वयोगटातील आहेत, त्यांचे मुद्दे कोणते आहेत, ते कोणत्या भागात राहतात यानुसार जाहिराती दाखवल्या जातात. यामुळे कमी खर्चात जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. व्हॉट्सॲप ग्रुप्सवरही पक्ष सतत संदेश पोस्टर्स, व्हिडिओ आणि माहिती पाठवत असतात. प्रत्येक भागात छोट्या सोशल मीडीया टीम्स तयार करून त्यांच्याद्वारे लोकांसोबत संवाद साधला जातो.

जरी डिजिटल प्रचार वाढला असला तरी प्रत्यक्ष भेटी आणि छोटे मेळावे यांचे महत्त्व अजूनही आहे. पण या कार्यक्रमांचे फोटो आणि व्हिडिओ लगेच सोशल मीडियावर टाकले जात असल्याने त्याचा प्रभाव दुप्पट होतो. त्यामुळे आता मेळावा जितका मोठा तितकं त्याचं डिजिटल प्रदर्शन अधिक महत्त्वाचं मानलं जातं. एकूणच पाहता, आजची निवडणूक ही डिजिटल आणि पारंपरिक प्रचाराचा समतोल राखत आहे. बदलत्या काळानुसार राजकीय पक्षांनीही आपला प्रचार अधिक स्मार्ट, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित केला आहे. येणाऱ्या काळात हा आधुनिक अंदाज आणखी मजबूत आणि प्रभावी होत जाईल, अशी चर्चा होत आहे.

लोकसंसद

## टिपू सुलतानविषयी आस्था अनाकलनीय

शासकीय परिपत्रकात कोणताही उल्लेख नसताना बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत टीपू सुलतानची जयंती साजरी करण्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या राज्यातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी हे राष्ट्रद्रोही कृत्य असल्याचे सांगत त्यासाठी जबाबदार असलेल्या शिक्षक, आयोजक आणि शिक्षण अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. टिपू सुलतानची जयंती साजरी करण्यावरून विविध राज्यांत दरवर्षी वाद होत असतात. संजय खान निर्मित द स्वोर्ड ऑफ टिपू सुलतान ही मालिका १९९० मध्ये दूरदर्शनवर झळकली होती. त्यामध्ये टिपू सुलतानच्या कथित पराक्रमाचे आणि लोकप्रेमाचेच दर्शन घडल्याने पडद्यामागील खरा टिपू सुलतान लोकांसमोर कधी आलाच नाही. मालिका नियमित पाहणाऱ्या काही महाभागांनी त्यावेळी टिपू सुलतानची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराजांशी केली होती. इतिहासकारांच्या मते टिपू सुलतान हा एक धर्मांध राजा होता.

मैसूरची सत्ता हाती आल्यानंतर त्याने सर्वप्रथम मैसूरला मुस्लिम राज्य घोषित केले. मंत्रिमंडळातील हिंदूंना पदच्युत करून त्या ठिकाणी मुस्लिमांची नियुक्ती केली. हिंदूंवर अत्याचार करण्यासाठी काही लाखांची फौज त्याने नेमली होती. ही फौज हिंदूंची मंदिरे उद्ध्वस्त करत, सरसकट गोहत्या करत, तलवारीच्या धाकावर हिंदूंचे धर्मांतर करत, हिंदू स्त्रियांवर अत्याचार करत. समाजासाठी पर्यायाने राष्ट्रासाठी आदर्श असणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या जयंती आणि पुण्यतिथी शाळा महाविद्यालयांत साजऱ्या केल्या जाऊन त्यानिमित्ताने त्यांच्या गौरवशाली चरित्रांची ओळख विद्यार्थ्यांना केली जावी असा प्रघात असताना क्रूरकर्मा टिपू सुलतानची जयंती साजरी करून शाळेने विद्यार्थ्यांसमोर चुकीचे आदर्श उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. टिपू सुलतान पराक्रमी होता यात वाद नाही; मात्र त्याचा हा पराक्रम केवळ आपली सत्ता वाढवण्यासाठी होता. भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र असले, तरी इथे हिंदू बहुसंख्य असल्याने हिंदूंवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या टिपू सुलतानविषयी काही भारतीयांत असलेली आस्था अनाकलनीय आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

दिनविशेष

# शिखांचे नववे गुरु तेग बहादुर सिंग

भारताच्या गौरवशाली इतिहासात असे अनेक क्रांतिकारक जन्माला आले, ज्यांनी आपल्या धर्म, संस्कृती, आदर्श आणि मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. या महापुरुषांपैकी ९ वे शीख श्री गुरु तेग बहादुर सिंग यांचे नावदेखील आहे. धर्म वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आज त्यांची पुण्यतिथी आहे. त्यांनी गुरु ग्रंथ साहिबमध्ये ११५ रचना समाविष्ट केल्या आहेत आणि त्यांना महिंद की चादर म्हणूनही ओळखले जाते. शिख धर्मासाठी दिलेल्या योगदानामुळे आणि काश्मिरी हिंदूंच्या रक्षणासाठी केलेल्या लढ्यामुळे त्यांचे खूप महत्त्व आहे.

गुरु तेग बहादुर यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर, पंजाब येथे झाला. त्यांची आई माता नानकी होत्या. तर ते गुरु हरगोविंद यांचे सर्वात धाकटे पुत्र होते. त्यांचे बालपण आणि शिक्षण गुरु हरगोविंद यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. गुरू तेग बहादुर यांच्या शौर्याबद्दल असे म्हटले जाते की, एकदा ते कर्तारपूरच्या युद्धानंतर वडील गुरु हरगोविंद साहिब यांच्यासोबत किरतपूरला जात होते. त्यावेळी ते फक्त १३ वर्षांचे होते. मुघल सैन्याच्या एका गटाने त्यांचा पाठलाग केला आणि फगवाडाजवळील पलाही गावात त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या युद्धात त्यांचे वडील गुरु हरगोविंद साहिब यांच्यासोबत गुरु तेग यांनीही मुघलांशी युद्ध केले. लहान वयातच तेगचे धाडस आणि जिद्द यामुळे तेग बहादुर बनले.

एक तत्वनिष्ठ आणि निर्भय योद्धा मानले जाणारे, ते एक विद्वान आध्यात्मिक विद्वान आणि कवी होते. ज्यांचे ११५ स्तोत्रे शीख धर्माचा मुख्य ग्रंथ असलेल्या गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात.

११ ऑगस्ट १६६४ रोजी दिल्लीहून शिखांचा एक गट पंजाबच्या बकाला गावात आला. त्यांच्या मृत्युपूर्वी सहा महिन्यांपूर्वी आठवे गुरु हरकिशन यांनी घोषणा केली होती की त्यांचा उत्तराधिकारी बकाला येथे असेल. बकाला येथे शिखांची एक विशेष बैठक झाली आणि तेग बहादूर यांना गुरु म्हणून नियुक्त करण्याची घोषणा करण्यात आली. एका पारंपारिक समारंभात, गुरुदित्त रंधावा यांनी गुरुंच्या कपाळावर भगवा टिळक लावला, त्यांना नारळ आणि पाच पैसे अर्पण केले आणि त्यांना गुरुच्या सिंहासनावर बसवले.

तेग बहादूर बकाला सोडून अमृतसरला गेले, जिथे हरमंदिर साहिबचे दरवाजे बंद होते. तिथून ते त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या किरतपूरला गेले. त्यानंतर त्यांनी किरतपूरपासून पाच किलोमीटर अंतरावर एक नवीन गाव स्थापन केले, ज्याचे नाव त्यांनी आनंदपूर ठेवले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. अहिंसा व सत्याचा प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी धर्मासाठी बलिदान करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श शीख धर्मात घालून दिला.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२४ नोव्हेंबर**

१) श्री. यशवंत काशिनाथ पाटील, २४-११-१९३१ परहुर, कामार्ले, अलिबाग
२) श्री. जगदीश रामचंद्र नागे २४-११-१९५७ अलिबाग-रेवस रोड
३) श्री. उदय चिंतामण जोशी २४-११-१९५४ ओम चिंतामणी, चेम्बर बालाजीनाका, अलिबाग

## चाकणमधून दोन बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या ताब्यात

**। चाकण । प्रतिनिधी ।**


चाकण येथे बेकायदा राहणाऱ्या दोन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर हद्दपारीची कारवाई सुरू केली आहे. याबाबतची माहिती चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय सोळंके यांनी दिली आहे. चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्त घालताना गोपनीय माहितीद्वारे पोलिसांनी या दोन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीनंतर, नजुल इस्लाम हसनअली गाजी (४७), सलमा बेगम मुजहर अली (३७) यांनी बांग्लादेशी नागरिक असल्याचे कबूल केले. हे पती-पत्नी मजूर म्हणून मेदनकरवाडी बंगला वस्ती येथे भाड्याच्या खोलीत राहत होते. पोलीस उपायुक्त मारुती जगताप, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सोळंके यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल पाटील, पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुनील शिंदे, पोलीस अंमलदार सुनील भागवत, प्रेमकुमार पावडे, विवेक सानप, उषा होले यांनी ही कारवाई केली.

## जनावर आडवे आल्याने अपघात

**। नेर । प्रतिनिधी ।**

जनावरे आडवे आल्याने भरधाव दुचाकीचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना नेर-यवतमाळ रस्त्यावरील कोलुरा गावाजवळ शनिवारी (दि.२२) दुपारच्या सुमारास घडली. चेतन खंडार (३५) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. या घटनेनंतर अपघाताच्या ठिकाणी बघ्यांची गर्दी मोठ्या प्रमाणात जमली होती. दरम्यान, त्यातील काही उपस्थितांनी नेर पोलिसांना या अपघाताची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी लगेच घटनास्थळ गाठून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीकरिता रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# आफ्रिकन स्वाइन फीवरचा शिरकाव



**। नाशिक । प्रतिनिधी ।**

नाशिक महापालिकेच्या विल्होळी खत प्रकल्पाच्या परिसरात एक आजारी डुक्कर आढळले होते. त्या डुक्कराला शरण फॉर ॲनिमल संस्थेन त्याचे संगोपन आणि उपचारासाठी नेले. मात्र, त्या डुक्करासह इतर डुक्करांचा देखील मृत्यू झाला. त्यामुळे या मृत डुक्करांचे नमुने भोपाळच्या हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसीज लॅबोरेटरीकडून पाठवले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून, आफ्रिकन स्वाइन फीवरचे नमुने मृत डुक्करांमध्ये आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय कृती आराखड्यानुसार बाधित क्षेत्र घोषित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले आहेत.

नाशिक येथे शरण फॉर ॲनिमल संस्थेतर्फे प्राण्यांचे संगोपन व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले जातात. गेल्या आठवड्यात या संस्थेकडील सहा ते सात डुक्कर मृत्युमुखी पडले होते. जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयाने या भागात पाहणी केली. त्यात त्यांना ८० गायी, १६ वासरे, ४ घोडे, २ गाढवे, १ बोकड व १५० श्वान आढळले. यापूर्वी संस्थेत १० मादी व २ नर डुक्कर होते. दोन आठवड्यांपूर्वी महामार्गाजवळ एक आजारी डुक्कर आढळल्याने संस्थेतर्फे त्यांना आश्रय देण्यात आला होता. पहिले त्या आजारी डुक्कराचा मृत्यू झाला व नंतर क्रमाक्रमाने इतर डुक्करही मृत्युमुखी पडले. त्यामुळे बाहेरून आलेल्या आजारी डुक्करांमुळे विषाणूजन्य रोग पसरल्याची शक्यता निश्चित झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. त्यानंतर मृत डुक्करांचे नमुने भोपाळ येथील हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसीज लॅबोरेटरीकडे पाठविण्यात आले होते. ते अहवाल प्राप्त झाले असून त्यात आफ्रिकन स्वाइन फीवरचे नमुने आढळले आहेत.

सध्या शरण संस्थेत एकही डुक्कर नाही. रॅपिड रिस्पॉन्स टीमने (आरआरटी) शरण संस्थेच्या डुक्कर पालन क्षेत्राचे दोन टक्के सोडियम हायपोक्लोराइट व चुन्याने निर्जंतुकीकरण केले असून, येथील परिसर ९० दिवसांसाठी न वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, १० किलोमीटर नियंत्रण क्षेत्र निश्चित करण्यात आले असून, सूक्ष्म सर्वेक्षण सुरू करण्यात आले. अद्याप कुठेही डुक्कर आजारी असल्याचे आढळले नाही. तसेच, १ किलोमीटर परिसर बाधित म्हणून घोषित करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी दिली.

### पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

जिल्ह्यात इतरत्र कुठेही डुक्कर आजारी आढळलेले नाहीत. पशुसंवर्धन विभागाकडून संपूर्ण सूक्ष्म नियोजन केले जात आहे. सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. हा आजार फक्त डुक्कर यांच्यातच संसर्गजन्य आहे. या आजारापासून मनुष्याला कोणताही अपाय होत नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती बाळगू नये, असे पशुसंवर्धन विभागाकडून सांगण्यात आले आहे.

### बाहेरून आलेल्या डुक्करांमध्ये विषाणूजन्य रोग

"शरण संस्थेकडील मृत डुक्करांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला असला, तरी सूक्ष्म सर्वेक्षणात अद्याप कुठेही डुक्कर आजारी असल्याचे आढळले नाही. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. जैवसुरक्षा उपाययोजना काटेकोर पाळाव्यात, प्राण्यांमध्ये काहीही आजाराची लक्षणे दिसल्यास जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा.
-डॉ. प्रशांत धर्माधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नाशिक."

## शेतीच्या अंतर्गत वादातून हत्या

**। घनसावंगी । प्रतिनिधी ।**

घनसावंगी तालुक्यातील शेवता गावातील शेतीच्या अंतर्गत वादातून ६ जणांनी लाठ्या व काठ्यांनी मारहाण करून एकाला जीवे मारले आहे. ही घटना शनिवारी (दि.२२) रात्री दहा वाजेच्या दरम्यान घडली. या प्रकरणी रविवारी (दि.२३) पहाटे साडेचार वाजता सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मण अश्रुबा कांबळे (५७) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण कांबळे आणि राहुल सोनावणे हे एकाच गावात राहत असून त्यांची समोरासमोर घरं आहेत. दरम्यान, मागील शेतीच्या अंतर्गत भांडणाच्या कारणावरून मनात राग धरुन राहुल सोनवणे याने लक्ष्मण कांबळे यांना धमकी दिली. त्यानंतर विकास सोनवणे यांनी लक्ष्मण कांबळे यांच्या घरासमोर गैरकायद्याची मंडळी जमवुन हातात काठ्या घेऊन कांबळे यांच्या डोक्यावर काठीने मारुन गंभीर दुखापत केली. त्यांनतर पुन्हा सखाराम सोनवणे याने काठीने कांबळे यांच्या डोक्यात मुक्कामार दिला. त्यात ते गंभीर जखमी होऊन ते जागीच ठार झाले.

त्यानंतर कमलबाई सोनवणे, अनिता सोनवणे व कल्पना सोनवणे यांनी कांबळे यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. या प्रकरणी शंशिकांत कांबळे (३५) यांनी तीर्थपुरी पोलीस ठाण्यात राहुल सोनवणे, विकास सोनवणे, सखाराम सोनवणे, कमलबाई सोनवणे, अनिता सोनवणे, कल्पना सोनवणे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली.

# अत्याचाराच्या दोन घटना उजेडात



**। गोंदिया । प्रतिनिधी ।**

सडक अर्जुनी तालुक्यातील एका गावात वडिलांनेच आपल्या १४ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना अलीकडेच उघडकीस आली. या घटनेची शाई वाळते न वाळते, तोच पुन्हा जिल्ह्यात मुलींवर अत्याचार करण्यात आल्याच्या दोन घटना उजेडात आल्या आहेत. घाटबोरी/ कोहळी येथील विद्यार्थिनी विनयभंग प्रकरणात मुख्याध्यापकाला अटक करण्यात आली आहे, तर नवेगावबांध येथे शाळेतच विद्यार्थिनीशी अश्लील चाळे करणारा शिक्षक फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सडक अर्जुनी तालुक्यातील घाटबोरी/कोहळी येथील एका शाळेतील मुख्याध्यापकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. गुन्हा दाखल करून मुख्याध्यापकाची कारागृहात रवानगी करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. कामेद दामोदर कापगते (५२) असे मुख्याध्यापकाचे नाव आहे. त्याने वर्गात शिकवताना द्विअर्थी शब्दांचा वापर करणे, विद्यार्थिनींना वाईट स्पर्श करणे इत्यादी गैरवर्तन निदर्शनास आल्याने विद्यार्थिनींनी घरी आपल्या पालकांना ही बाब सांगितली. त्यानंतर शाळेचे अध्यक्ष शामराव मस्के यांनी डुग्गीपार पोलिसांत १५ नोव्हेंबर रोजी तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून मुख्याध्यापकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

तसेच, दुसऱ्या घटनेत नवेगावबांध येथील एका शाळेतील शिक्षक सुरेश फागुजी बाळबुद्धे याने एका अल्पवयीन विद्यार्थिनीशी १४ नोव्हेंबरला अश्लील चाळे केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेतील शिक्षक फरार असून, पोलीस त्याच्या मागावर आहेत. या शिक्षकाने शाळेत खेळाच्या सुट्टीत वर्गात एकटीच बसून अभ्यास करीत असलेल्या विद्यार्थिनीसोबत अश्लील चाळे केले. पीडित मुलीच्या आईने याबाबतची तक्रार नवेगावबांध पोलिसांत दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी १९ नोव्हेंबर रोजी आरोपी शिक्षकावर गुन्हा दाखल केला असून, शिक्षक फरार असल्याची माहिती मुख्याध्यापकांनी दिली आहे. त्याचा शोध सुरू आहे.

# निवडणूक आयोगाची देशद्रोही कृत्ये

### आदित्य ठाकरे यांचा गौप्यस्फोट



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आमदार आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाची देशद्रोही कृत्ये लवकरच जगासमोर आणणार असल्याचे वक्तव्य त्यांनी केले आहे. पुढच्या काही दिवसांत निवडणूक आयोगाच्या देशद्रोही कृत्यांचे गौप्यस्फोट आम्ही करणार आहोत, असा इशारा त्यांनी ट्विटरवरून दिला आहे.

शिवसेना ठाकरे गटाच्या एका पदाधिकाऱ्याने महापालिकेतील मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेकडून रीतसर शुल्क भरून प्रारूप मतदार यादी घेतली होती. त्या यादीवर १४ नोव्हेंबरची तारीख आहे. तर, सर्वांसाठी प्रदर्शित झालेली यादी ही २० नोव्हेंबरला प्रदर्शित झाली आहे. या यादिवरील तारखांच्या तसेच प्रदर्शनातील गोंधळावरून आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला फटकारले आहे. ते म्हणाले की, हा गोंधळ नव्हे तर देशद्रोहाचा गुन्हाच आहे. आमच्या एका पदाधिकाऱ्याने प्रारूप मतदार यादी महापालिकेतील मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेकडून रीतसर शुल्क भरून घेतली. परंतु, या यादीवरची तारीख १४ नोव्हेंबर अशी आहे. आणि खरी यादी २० नोव्हेंबर रोजी सर्वांसाठी ऑनलाईन प्रकाशित झाली. सुरुवातीला ही यादी ७ नोव्हेंबरला येणार होती; परंतु, ती १४ आणि २० नोव्हेंबर रोजी प्रकाशित झाली, असे आदित्य ठाकरे यांनी ट्विटमध्ये नमूद केले. यावरून आदित्य ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला काही प्रश्न विचारले असून येत्या काही दिवसांत निवडणूक आयोगाच्या आणखी काही देशद्रोही कृत्यांचे गौप्यस्फोट करणार असल्याचा इशारा दिला आहे.

## अफवेमुळे मालेगाव न्यायलयात धुडगूस

**। मालेगाव । प्रतिनिधी ।**

डोंगराळे येथील घटनेच्या निषेधार्थ मालेगाव येथे शुक्रवारी (दि.२२) सुजाण नागरिकांतर्फे बंदचे आवाहन करण्यात आले होते. महिलांसह हजारो नागरिकांनी या आंदोलनात सहभाग घेऊन आंदोलन यशस्वी केले. अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिल्यावर आंदोलनाची सांगता झाली. दरम्यान, काही नागरिक आंदोलनातून परत जात असताना न्यायालयात पोलिसांची गाडी उभी दिसल्याने जमावात आरोपीला न्यायालयात आणल्याची अफवा पसरली. त्यामुळे संतप्त जमावाने मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरण्याचा प्रयत्न केला. प्रवेशद्वार आतून बंद असल्याने जमावाने ते तोडून न्यायालय परिसरात प्रवेश केला. काही जण न्यायालयाच्या आत शिरण्याच्या तयारीत होते; मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना रोखून धरले. काही तरुणांनी काचेच्या दरवाजांवर लाथा मारून हानी करण्याचा प्रयत्न केला. ही परिस्थिती पाहून दुसरा जमाव इंदू मेमोरियल रुग्णालयाजवळील प्रवेशद्वारातून आत जाण्याचा हट्ट धरत पोलिसांशी हुज्जत घालत होता. छावणी पोलिसांनी न्यायालयाच्या मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या, तसेच सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या १०० ते १५० जणांविरोधात गुन्हे नोंदविले आहेत.

## सावर्डे विद्यालयात मार्गदर्शन शिबीर

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण घेऊन स्वतःचे भविष्य भक्कम बनवणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नसून उद्योग, व्यवसाय किंवा नोकरी क्षेत्रात टिकून राहण्यासाठी व्यवसायिक शिक्षण महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सह्याद्री औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य उमेश लकेश्री यांनी केले. सह्याद्री शिक्षण संस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सह्याद्री औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालयाच्यावतीने व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र वारे, उपप्राचार्य विजय चव्हाण, आयटीआयचे प्राचार्य उमेश लकेश्री, निदेशक सुभाष गोरीवले, संदीप बुदर, स्वप्निल बांबाडे, प्रथमेश पाटील तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, इयत्ता दहावी व बारावीचे विद्यार्थी आणि तब्बल २८७ पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य उमेश लकेश्री यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावी-बारावीनंतर योग्य कोर्सची निवड ही करिअर घडविण्यामधील पहिली पायरी आहे. आयटीआयच्या माध्यमातून विद्यार्थी अल्पावधीत कौशल्य प्राप्त करून स्वावलंबी होऊ शकतात. विविध व्यवसाय क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर मागणी असून उद्योगधंद्यांमध्ये रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. त्यानंतर इतर मान्यवरांनी देखील मार्गदर्शन केले.

**गुणवत्ता निर्देशांक २१० अंकाच्या पातळीवर** | **आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती**

# मुंबईतील रविवारची सकाळ प्रदूषित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**गेल्या आठवड्यात मुंबई शहर आणि उपनगरांत थंडीची तीव्रता वाढली आहे. सलग चार दिवस तापमान १६-१७ अंशांच्या आसपास राहिले आहे. त्यामुळे सुखद गारवा अनुभवणाऱ्या मुंबईकरांना रविवारी (दि.२३) मात्र हवेच्या ढासळलेल्या गुणवत्तेने चिंतेत टाकले आहे. सकाळी शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक २१० अंकांच्या पातळीवर गेला होता. हा निर्देशांक हवेची गुणवत्ता गंभीर श्रेणीत दर्शवत आहे. त्याचा मुंबईकरांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होण्याची भिती असल्याने सर्वांनी प्रदूषित हवेत जाणे टाळावे, असा सल्ला आरोग्य क्षेत्रातील जाणकारांकडून दिला जात आहे.**



राज्यात थंडीचा जोर वाढत असून अशातच मुंबईतील रविवारची सकाळ प्रदूषित हवेची ठरली आहे. शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक गंभीर श्रेणीत असल्याचे आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. एक्युआयडॉटइन या संकेतस्थळावर हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाची नोंद होते. रविवारी सकाळी ८ वाजून ३७ मिनिटांनी शहराचा एक्यूआय २१० अंकांच्या अत्यंत खराब पातळीवर नोंदवला गेला. या प्रदूषित हवेने सर्व वयोगटांतील मुंबईकरांची चिंता वाढवली आहे. सकाळी उपनगरांतील तापमान २४ ते ३० अंश सेल्सिअसच्या आल्हाददायक तापमान श्रेणीत असूनही प्रदूषित हवेमुळे मुंबईकरांना जड आणि अस्वस्थ वाटत होते. पहाटेपासूनच धुके पसरले होते. त्यामुळे आकाश निस्तेज आणि अस्पष्ट दिसत होते. सूक्ष्म कणांचे उच्च प्रमाण हे यामागील प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांनीद्य म्हटले आहे.

मुंबई शहराच्या हवेतील पीएम२.५ पातळी प्रति घनमीटर सुमारे १३४ मायक्रोग्राम असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर पीएम१० पातळी प्रति घनमीटर सुमारे १६९ मायक्रोग्राम असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दोन्ही पातळी मानवी आरोग्यासाठी सुरक्षित मर्यादेपेक्षा खूप जास्त आहेत.

# निवडक

## मुंबईच्या माजी फुटबॉलपटूचा मृत्यू



**मुंबई** : पुण्याला फुटबॉल सामन्यात सहभागी व्हायला गेलेल्या माजी १६ वर्षाखालील फुटबॉलपटूचा जंगलात मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. सागर सोरती (३५) असे या फुटबॉलपटूचे नाव आहे. याप्रकरणी कासा पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सागर सोरती हा १५ नोव्हेंबर रोजी घरातून पुण्याला फुटबॉल साममन्यात सहभागी व्हायला जातोय, असे सांगून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून त्याचा फोन बंद येत होता. कुटुंबीयांनी त्याच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र, त्याचा थांगपत्ता लागत नव्हता. अखेर पोलिसांना पालघरमधील मेंढावन घाटातील जंगलात त्याचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. सागरच्या मोबाईलमुळे पोलिसांना त्याची ओळख पटवली. सागर गेल्या दोन वर्षांपासून मानसिक तणावात असल्याचे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालयात पाठवला आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण कळेल, असे पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी सांगितले.

## ठाण्यात भाजपाला मोठे भगदाड

**ठाणे** : शिंदे गट आणि कपटकारस्थानी भाजपच्या राजकारणाला कंटाळून ठाणे जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते आता शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात स्वाभिमानाने दाखल होत आहेत. डोंबिवलीतील भाजपच्या कार्यकर्त्यांनी रविवारी (दि.२३) मातोश्री येथे ठाकरे गटात जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांचे शिवबंधन बांधून स्वागत केले. यावेळी बोरिवलीतील शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनीही ठाकरे गटात प्रवेश केला. डोंबिवलीतील भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष योगेंद्र भोईर व त्यांची पत्नी ट्विंकल भोईर यांनी देखील प्रवेश केला आहे. यावेळी उपनेते संपर्पप्रमुख गुरुनाथ खोत, जिल्हाप्रमुख तात्यासाहेब माने, डोंबिवली शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, शिंदे गटाचे दहिसर विधानसभेतील संदीप राऊत व बोरिवली विधानसभेतील रूपेश नाईक यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे सचिव विनायक राऊत, उपनेते विनोद घोसाळकर, माजी आमदार विलास पोतनीस, विभागप्रमुख उदेश पाटेकर, विभाग संघटक शुभदा शिंदे, तेजस्वी घोसाळकर यांच्यासह शिवसैनिक-पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाविस्तार एआय ॲपबाबत मार्गदर्शन



**मंडणगड** : येथील लोकनेते गोपीनाथजी मुंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने कृषि विभाग ॲपवरील विविध योजना तसेच स्पर्धा परीक्षा तयारी या विषयावर कृषि अधिकारी सोमनाथ आहेरकर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी संदीप निर्वाण, डॉ. महेश कुलकर्णी, स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख डॉ.भरतकुमार सोलापूरे, जी.के. अभंग, एस.एम. पवार, आर.एस. मर्चंड, बी.एन. नागरगोजे, जे.एम. पाटील, माळी, तळेकर, डॉ. दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंडणगड कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महाराष्ट्र राज्य कृषि विभागाचा 'महाविस्तार एआय' हा ॲप महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये डाउनलोड करुन देण्यात आला आणि त्यावर संबंधीत विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर त्या ॲपवर उपलब्ध असलेल्या शासनाच्या विविध योजनांची व सेवांची सविस्तर माहिती सोमनाथ आहेरकर यांनी दिली.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून कर्जतच्या निवडणूक तयारीचा आढावा



**नेरळ** : कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कर्जत येथील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. कर्जत शहरातील नगरपरिषद कार्यालयात उभारण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय तसेच मतदान यंत्र ठेवण्यात आलेले स्ट्राँग रूमच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. जिल्हा पोलीस अधिकारी यांच्याकडून कर्जत पोलीस उपअधिक्षक कार्यालयात पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना कायदा सुव्यवस्था यांची कडकपणे अंमलबजावणी करण्यात यावी, अशी सूचना केली. कर्जत नगरपरिषदेच्या थेट जनतेतून निवडून द्यायच्या नगराध्यक्षपदासाठी आणि दहा प्रभागातून निवडून द्यायच्या जागांसाठी निवडणूक होत आहे. कर्जत नगरपरिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असलेल्या नगरपरिषद कार्यालयात जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी कर्जत नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. धनंजय जाधव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा पालिका मुख्याधिकारी तानाजी चव्हाण आणि नायब तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन राऊत तसेच निवडणुकीत सहभागी अधिकारी वर्ग उपस्थित होते. यावेळी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून पालिका मुख्यालयातील निवडणुकीच्या संदर्भातील सर्व यंत्रणांची पाहणी केली.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



**वैद्यक शास्त्रात जे अनेक संशोधन आजपर्यंत झालेले आहेत, त्यापैकी अँटिबायोटिक्सची औषधं हे एक महत्त्वाचं संशोधन मानलं जातं. योग्य व खात्रीदायक परिणाम तसेच मुबलक उपलब्धता यामुळे अँटिबायोटिक्सच्या वापराबरोबरच गैरवापरही होण्याची शक्यता असते व ते होऊ नये म्हणून हा विषय समजून घेणे, तसेच अँटिबायोटिक्स वापरण्याविषयी पार्श्वभूमी आपणा सर्वांना कळावी, याकरिता हा लेख उपयोगी ठरू शकतो.**

# अँटिबायोटिक्स व मानवी आरोग्य

डॉ. राजेंद्र चांदोरकर
बालरोगतज्ज्ञ, अलिबाग

‘अँटिबायोटिक्स’ हा शब्द सर्वांना परिचित असेलच. मनुष्यामध्ये होणाऱ्या जिवाणूच्या संसर्गाविरोधात काम करणारं औषधी रसायन म्हणजेच अँटिबायोटिक्स. खरं तर ‘अँटीमाइक्रोबियल्स’ (प्रतिजैविकं) या विषयांतर्गत अँटिबायोटिक्स मोडतात. अँटीमायक्रोबियल्स- प्रतिजैविकं म्हणजे विविध सूक्ष्म जिवांविरुद्ध काम करणारी औषधं... मग ते जिवाणू असोत, विषाणू असोत बुरशी अथवा अमिबासारखे प्रोटोझोआ असोत. मानवी शरीरात होणाऱ्या विविध जिवाणूजन्य जंतुसंसर्गाच्या आजारांविरुद्ध अँटिबायोटिक्स लढा देतात.

सर्वसामान्यपणे तापाच्या आजारांमध्ये अँटिबायोटिक्स मेडिसिन्सचा वापर केला जातो; परंतु तापाचे सर्वच आजार हे जिवाणूच्या जंतुसंसर्गमुळे होणारे नसतात. सूक्ष्मजीवांमुळे होणारे तापाचे आजार हे मुख्यत्वे करून विषाणूजन्य आजार असतात ज्या आजारांमध्ये अँटिबायोटिक्स कामच करत नाहीत, तर ज्या ज्या ठिकाणी जिवाणूंचा संसर्ग आढळतो, त्या त्या ठिकाणी अँटिबायोटिक्सचे मेडिसिन्स वापरले जातात. तापाचे काही आजार तर सूक्ष्मजीवांमुळे होणारे नसतातच व तेथे अँटीबायोटिक्सच्या औषधांची गरज नसते. न्यूमोनिया, डिसेंट्री, मेंदूजवर, टॉन्सिल्सचा व घशाचा जंतुसंसर्ग, हाडांमधील, हृदयामधील जिवाणूचा जंतुसंसर्ग इत्यादी आजारांमध्ये अँटिबायोटिक्सचे मेडिसिन्स वापरणे अपरिहार्य मानले जाते. लहान व मोठ्या माणसांच्या आय.सी.यू.मध्ये विशेषतः अँटीबायोटिक्सचा वापर केला जातो. कॅन्सरयुक्त आजारांमध्ये जेव्हा किमोथेरपी चालूअसते, त्यावेळेसही अँटिबायोटिक्सचा वापर केला जातो.अँटिबायोटिक्सची मेडिसिन्स सर्वसाधारणपणे डॉक्टरांच्या अनुभवाप्रमाणे, त्या भागातील जंतुसंसर्गाच्या सर्वसाधारण पॅटर्नप्रमाणे, तसेच शरीरातील काही द्रवांच्या कल्चरच्या (ब्लड, युरीन, सी.एस.एफ, असायटिक व प्ल्यूरल फ्लूईड) रिपोर्टप्रमाणे वापरले जातात.



जिवाणूचा पुरता संहार करणे, जिवाणूंमध्ये काही बदल घडवून आणून त्यांची उत्पत्ती कमी करणे तसेच जिवाणूंना अशक्त बनवून शरीरातील प्रतिकारशक्तीने त्यांना नष्ट करणे इत्यादी प्रकारे अँटिबायोटिक्स शरीरातील संसर्ग कमी करून संसर्गजन्य आजार बरे करतात.

अँटिबायोटिक्सचे बरेच ग्रुप्स असतात व मनुष्याच्या शरीरातील कोणत्या अवयवाचा संसर्ग झालेला आहे, त्याप्रमाणे कोणत्या ग्रुपचा अँटिबायोटिक्स वापरायचं व किती दिवसांचा कोर्स करायचा हे डॉक्टर्स ठरवतात.

१९२८ मध्ये अलेक्झांडर फ्लेमिंगने पेनिसिलिनचा शोध लावला. पेनिसिलीन व इतर अँटिबायोटिक्स हे सूक्ष्मजीवांपासूनच बनवलेले असतात, तर काही अँटिबायोटिक्स हे इतर रासायनिक मिश्रणापासून बनवलेले असतात. आजतागायत बरेच नवनवीन अँटीबायोटिक्स तयार करण्यात शास्त्रज्ञांना यश आला आहे; परंतु मागील काही वर्षात नवीन अँटिबायोटिक्सचा शोध लागण्यावर मर्यादा आलेल्या आहेत.

अँटिबायोटिक्सशी संबंधित काही मुद्दे येथे नक्कीच नमूद करावेसे वाटतात. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, अँटिबायोटिक्स खूप जपून वापरावे लागतात, कारण त्यांना साईड इफेक्ट्ससुद्धा असतात. बरेच अँटिबायोटिक्स महाग असतात, तसेच गरज नसताना अँटिबायोटिक दिले गेले तर जिवाणूंमध्ये काही जनुकीय बदल होऊन हेच जिवाणू अँटीबायोटिक्सना प्रतिरोध करतात ज्याला अँटिबायोटिक रेझिस्टन्स म्हणतात. वळूयात पहिल्या मुद्द्याकडे; बऱ्याचशा अँटिबायोटिक्समुळे पोट बिघडणं, ॲसिडिटी होणं, डायरिया होणं हे साईड इफेक्ट्स दिसून येतात, तर काही अँटिबायोटिक्स हे लिव्हर व किडनीच्या आजारांमध्ये जपून वापरावे लागतात, कारण त्यांचं चयापचन हे लिव्हरमध्ये होतं तर उत्सर्जन किडनीद्वारे होतं. काही लोक अँटिबायोटिक्सच्या औषधांना ॲलर्जीक असतात. अँटिबायोटिक्सच्या मेडिसिन्समुळे अंगावर पित्त उठतं व प्रसंगी जीवाला धोका निर्माण करणारा जीवघेणप्रसंगी समोर येऊ शकतो. नाहक वापरलेल्या अँटिबायोटिक्समुळे उपचारांच्या खर्चाचा बोजा नातेवाईकांना सहन करावा लागतो, खूप आर्थिक नुकसान सहन करावा लागतो.

अँटिबायोटिक रेझिस्टन्स - अँटिबायोटिक प्रतिरोध हा एक वेगळा विषय आहे; ज्यामध्ये अँटिबायोटिक्सचा अतिप्रमाणात वापर केला गेला तर जीवाणूंमध्ये काही जणूकीय बदल होतात व हे जिवाणू साध्या-साध्या अँटिबायोटिक्सनादेखील दाद देत नाहीत. उपचारांमध्ये अडचणी निर्माण होतात व योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे जिवाणूच्या जंतू संसर्गात रुग्ण दगावण्याची शक्यता होऊन जाते. बरेचसे तापाचे रुग्ण हे विषाणूजन्य आजाराचे असतात, ज्यांच्यामध्ये अँटिबायोटिक्स वापरण्याची गरजच नसते.

अँटिबायोटिक्स वापरण्याचा अधिकार हा डॉक्टरांनाच असतो आणि त्यामुळे सर्व डॉक्टरांनी अँटिबायोटिक्सचा वापर कौशल्यतेने जिवाणूच्या जंतू संसर्गामध्ये कसा करावा याविषयी नियमितपणे अपडेट्स घेणं गरजेचं असतं आणि हे अपडेट्स त्यांना वेळोवेळी होणाऱ्या कॉन्फरन्सेसमधून घेता येतात.

तापाचे व जंतुसंसर्गाचे रुग्ण फॅमिली फिजिशियनसकडे जाण्याचे प्रमाण जास्त असतं, तसेच लहान व मोठ्या माणसांच्या आय.सी.यूमध्येदेखील अँटिबायोटिक्स वापरण्याचं प्रमाण जास्त असतं. म्हणून त्यांना यासंदर्भात एक्सपर्ट डॉक्टर्सनी माहिती पुरवणं गरजेचं असतं, तसेच त्यांनी स्वतःदेखील अँटिबायोटिक्सच्या प्रभावाविषयी अभ्यास करणं व अपडेट्स घेणं गरजेचं असतं.वेगवेगळ्या प्रकारचे जिवाणूजन्य आजार व अँटिबायोटिक्स याविषयी स्वतःला जागृत व अपडेटेड ठेवणे हे प्रत्येक डॉक्टरचे आद्य कर्तव्य आहे. मेडिकल मेडिकल शॉप्समध्ये ओव्हर द काउंटर अँटिबायोटिक मेडिसिन्स देणं टाळणं ही मेडिकल स्टोअर ओनर्सची नैतिक जबाबदारी आहे. फार्मा कंपन्यांच्या प्रतिनिधींनीसुद्धा अँटिबायोटिक्सच्या चुकीच्या प्रमोशन्सना आळा घालणं गरजेचं आहे. आजकाल बरेच नातेवाईक गुगल सर्चिंग करून डॉक्टरांना तापाच्या पहिल्या दिवशीसुद्धा अँटिबायोटिक का देत नाहीत म्हणून विचारतात, जे चुकीचं आहे. तापाच्या रुग्णांना अँटिबायोटिक्स मेडिसिन केव्हा द्यायचं हे ठरवण्याचा अधिकार डॉक्टरांनाच असतो, त्यामुळे चुकीच्या गोष्टी वाचून/ऐकून डॉक्टरांच्या उपचारांमध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न नातेवाईकांनी कधीच करू नये. अर्थात, आजारांविषयी चौकशी करण्याचा हक्क नातेवाईकांचा असतो, हेही येथे मी नमूद करूइच्छितो.तापाचा रुग्ण बरा करण्यासाठी अँटीबायोटिक हे उत्तर निश्चितच नाही, कारण बरेचसे जंतुसंसर्गाच्या तापाचे रुग्ण यांना विषाणूजन्य संसर्ग असतो ज्यामध्ये अँटिबायोटिकची गरज नसते. वर नमूद केल्याप्रमाणे काही तापाचे आजार तर संसर्ग नसलेल्या आजाराचे असतात.

जिवाणूंचा अँटीबायोटिक्सला होणारा प्रतिरोध म्हणजेच ‘अँटिबायोटिक रेझिस्टन्स- अँटिबायोटिक प्रतिरोध’ टाळायचं असेल तर आपण सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे यामध्ये मी डॉक्टर्स, मेडिकल शॉप ओनर्स, फार्मा सेक्टर्स व त्यांचे प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य लोक यांचा उल्लेख करेन.

Let us come together to prevent Antibiotic Resistance because Antibiotics are not always answer to combat or treat fever. •

## निवडक



### शैक्षणिक साहित्याची मदत

**सुतारवाडी :** परतीच्या मान्सन पाऊसाने महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील अनेक जिल्हांना झोडपून काढून पूरग्रस्त वातावरण निर्माण केले होते. अशातच या पाऊसाने बीड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये व विद्यार्थ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्यांचे नुकसान झाले होते. याची जाणीव ठेवून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेत्तर कर्मचारी यांना शैक्षणिक साहित्य जमा करण्याचे आवाहन केले होते. त्या प्रमाणे विद्यार्थी व शिक्षक-शिक्षेकेत्तर कर्मचारी यांनी शैक्षणिक साहित्य जमा केले. ते शैक्षणिक साहित्य बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांच्याकडे नुकतेच सुपुर्द केले. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या या उपक्रमामुळे बीड व रायगड जिल्ह्यात अभिनंदन होत आहे.



### ‘ज्येष्ठ नागरिकांना शासन मानधन देणार’

**अलिबाग :** महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिकांची संख्या वाढत असून त्याच्या साठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजनांबाबत वधेयक मंजुरीचे राजपत्र प्रसिद्ध केले आहे. या योजना मिळविण्यासाठी वयाची ६५ वर्ष पूर्ण झाली असतील त्यांनी जेष्ठ नागरिक ओळखपत्र शासनाच्या ई-सेवा केंद्रात काढावे असे मार्गदर्शन अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या बैठकीत प्रा.डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले. यावेळेस अध्यक्ष प्रफुल्ल राऊत व उपाध्यक्षा चारुशिला कोरडे व्यासपीठावर उपस्थित होते. जयपाल पाटील म्हणाले की,ज्या ज्येष्ठ नागरिकास कोणतीही पेन्शन मिळत नाही, त्याना आता दरमहा रूपये ७००० मिळणार असुन, पर्यटन स्थळे, मंदिरे पाहण्यास वर्षाला रु.१५००० अनुदान मिळणार असून, निराधार ज्येष्ठाना राहण्याची व जेवणाची सोय मोफत शासन करणार आहे. ७० वर्षावरील ज्येष्ठांना रेल्वे प्रवास ५० टक्के सवलत तर राज्य परिवहनकडून एसटीप्रवास ५० टक्के सवलत त्याचबरोबर मालमत्ता करात ३० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

# राज्यातील शाळांमध्ये नव्याने होणार पटपडताळणी

■ **१५ डिसेंबरला माहिती अंतिम करण्याचे आदेश**

■ **शाळा व संस्थांना बसणार चाप**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील काही शाळांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून पटसंख्या फुगविण्यात येत असल्याच्या तक्रारी होत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी संख्येची काटेकोर पडताळणी केली जाणार आहे. यामुळे बोगस विद्यार्थी संख्या दाखविणाऱ्या शाळा व संस्थांना चाप बसणार आहे.

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी उपस्थितीची माहिती यू-डायस प्लस या पोर्टलवर संबंधित मुख्याध्यापकाद्वारे नोंदविण्यात येते. या पोर्टलवर नमूद असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार दरवर्षी संच मान्यता अंतिम केली जाते.

त्या आधारावर त्या-त्या शाळांमधील शिक्षक पदांची संख्या निश्चित केली जात असते. परंतु काही शाळांमध्ये ही पटसंख्या वाढवून दाखवली जात असल्याने शिक्षकांची अनावश्यक पदे देखील निर्माण होत आहेत.

पोर्टलवर दाखवलेली विद्यार्थी संख्या आणि प्रत्यक्ष वर्गात उपस्थित विद्यार्थी याची खातरजमा करण्याचा प्रयत्न शिक्षण खात्याचा या निमित्ताने आहे. या माहितीचे प्रमाणिकरण व सत्यता पडताळणीची जबाबदारी कार्यक्षेत्रातील केंद्रप्रमुख व गट शिक्षणाधिकाऱ्यांवर टाकण्यात आली आहे. त्यामध्ये अनियमितता झाल्यास केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा शिक्षण खात्यातर्फे देण्यात आला आहे.

> या पडताळणीसाठी राज्यस्तरावर देखील विशेष पथकांची निर्मिती केली जाणार आहे. या पथकांच्या माध्यमातून एकाचवेळी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती पोर्टलवरील नोंदीप्रमाणे आहे की नाही, हे तपासण्यात येणार आहे. पडताळणीत अनियमितता किंवा चुकीच्या पद्धतीने विद्यार्थी प्रविष्ट झाल्याचे निदर्शनास आल्यास त्या संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे .

मुख्याध्यापकांनी नोंदवलेली यू-डायस प्लस पोर्टलवरील विद्यार्थी संख्येची माहिती केंद्रप्रमुखांकडे वर्ग केली जाते. विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती, भेटीच्या दिवशी हजर असलेले विद्यार्थी,परीक्षा दिनांकाच्या दिवशी उपस्थित विद्यार्थी तसेच यापूर्वी शाळा भेट झाल्याच्या प्रसंगी असलेली दैनिक उपस्थिती या सर्व बाबी तपासून ही माहिती केंद्रप्रमुखांनी फेरपडताळणीसाठी गटशिक्षणाधिकारी लॉगिनला वर्ग करावयाची आहे.

वर्ग झालेल्या विद्यार्थ्यांच्या या माहितीची गटशिक्षणाधिकाऱ्यांनी पुनश्च पडताळणी करावी, असेही बजावण्यात आले आहे.

# मेंढपाळांची गावोगावी भटकंती सुरू

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

घाटमाथ्यावरून येणारा धनगर समाज प्रत्येकाच्या परिचयाचा असून, पोटाची खळगी भरण्यासाठी शेकडो मैल प्रवास करीत हा धनगर समाज कोकणात येतो. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तशीच स्थिती या मेंढपाळांची निर्माण झाली आहे.

आपल्या सोबत आपली मुले, आणि मेंढ्या घेऊन मिळेल तिथे मुक्काम करणे, हे वर्षानुवर्ष चालत असलेले गणित असून, यामुळे मुलांच्या शिक्षणाची परवड होत आहे. लहान मुलांना घोड्यावर बसवून, रणरणत्या उन्हाची आणि थंडीची तमा न बाळगता, त्यांचा प्रवास मे महिन्याच्या अखेरीपर्यंत सुरूच असतो. असे असले तरी दरवर्षी मेंढपाळ आपला लवाजमा घेऊन, कोकणात दाखल होतात.

पाऊस गेला की कोकणात अनेक जण पोटाची खळगी भरण्यासाठी येत असतात. त्यापैकी असलेला मेंढपाळ



हा मिळेल तिथून मार्ग काढत, हा समाज तालुक्यातील बहुतांश भागात मेंढपाळांनी व्यापलेला पहावयास मिळत आहे. कोकणात पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढलेल्या असतात. या काटेरी वनस्पती पासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो.

त्याचबरोबर पाण्याची आणि वाहतुकीची समस्या गंभीर बनत चालली आहे. मेंढ्या घाटमाथ्यावरून घेऊन येणे म्हणजे मोठ्या जिकरीचे काम असते. मात्र तसे असले तरी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या व्यवसायाला खंड पडू नये, यासाठी मेंढपालन करण्याचा व्यवसाय आम्ही करतो असे मत एका मेंढपाळाने व्यक्त केले.

# शेलघरच्या विकासकामांची पाहणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेलघरमध्ये भव्यदिव्य साई मंदिराची उभारणी होत आहे. त्यासाठी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू ठेवली आहे. साई मंदिरात भाविकांना जाणे सुलभ व्हावे, यासाठी आज सिडको अधिकाऱ्यांसोबत महेंद्र घरत यांनी शेलघरचा दौरा केला. विकासकामांबाबत काही पर्याय सुचवले. तसेच शेलघर-गव्हाण रस्ता तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. यावेळी सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सिडकोचे सहायक कार्यकारी अभियंता भूषण पाटील म्हणाले, शेलघरच्या तलावाला भिंत टाकून बाजूने साईभक्तांसाठी रस्ता तयार करता येणे शक्य आहे. त्यासाठी आम्ही प्राथमिक स्वरूपात कामाला



सुरुवात केली आहे, लवकरच हा प्रस्ताव सिडकोच्या वरिष्ठांकडे पाठवून त्याला मंजुरी मिळाल्यावर ते काम मार्गी लागेल.

यावेळी महेंद्र घरत म्हणाले, शेलघर हे नवी मुंबई, रायगडमध्ये सुनियोजित आणि स्वच्छ गाव आहे. परिस्थितीनुरूप सिडको अधिकाऱ्यांना धारेवर धरून शेलघरचा विकास केला आहे. उर्वरित कामे सिडकोच्या माध्यमातूनच करून घेणार, त्यासाठी सिडकोसोबत संघर्ष करावा लागला तरी चालेल.

# महाविद्यालयातील १५ प्राध्यापक झाले पीएचडीधारक

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाडच्या शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पोलादपूर तालुक्यातील चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. स्नेहल कांबळे यांना मुंबई विद्यापीठाने नुकतीच रसायनशास्त्र विषयातील पीएचडी ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी बहाल केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ.महेश वल्ले यांनी दिली. यामुळे महाविद्यालयाच्या २० पूर्णवेळ प्राध्यापकांपैकी १५ प्राध्यापक पीएचडीधारक डॉक्टरेट प्राप्त झाले आहेत.



पीएचडी पदवीसाठी डॉ. स्नेहल कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रामध्ये संशोधनाचे कार्य केले. सदर संशोधनासाठी त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून नेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांचे मार्गदर्शन लाभले. स्टडीज ऑन स्ट्रक्चरल ऍंड सिंथेटिक प्रॉपर्टीज ऑफ मिक्स्ड मेटल टार्टस या विषयावर सखोल संशोधन करून डॉ. स्नेहल कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाला आपला संशोधन प्रबंध सादर केला. पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने डॉ.स्नेहल कांबळे यांचा पुष्पगुच्छ प्रदान करून विशेष सत्कार करण्यात आला.

सुंदरराव मोरे महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाजाबरोबरच सांस्कृतिक विभाग, महिला विकास कक्ष इत्यादी विभागांचे कामकाजामध्ये विभाग प्रमुख म्हणून योगदान देत तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून डॉ. स्नेहल कांबळे यांनी पीएचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन समारंभामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी त्यांचा गौरव केला.

चोळई येथील सुंदरराव मोरे महाविद्यालयामधील डॉ.महेश वल्ले, डॉ.समीर बुटाला, डॉ.नाथीराम राठोड, डॉ.मंगेश गोरे, डॉ.प्रभाकर गावंड, डॉ.जयश्री जाधव, डॉ. सुधाकर जाधव, डॉ.बालाजी राजभोज, डॉ. पोपट भोसले, डॉ.शैलेश जाधव, डॉ.वसंत डोंगरे, डॉ.सुदर्शन दवणे, डॉ.राम बरकुले यांच्यानंतर आता डॉ. स्नेहल कांबळे या पंधराव्या पीचएचडी पदवीधारक डॉक्टरेट प्राप्त प्राध्यापक ठरल्या आहेत. शिवाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे, उपाध्यक्ष ॲड. विनोद देशमुख यांनी डॉ. स्नेहल कांबळे यांचे अभिनंदन केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबागमधील नामांकित हॉस्पिटलसाठी नर्स, वॉर्डबॉय, बहुद्देशीय कार्यकारी महिला पाहिजेत. मो. ९९२३५०६७७९/८३९०४५५५६५/७५०६३२९९११

● Vacancy for, office staff ,for office in Alibag Attractive salary Call 9923750549

● अंश एन्टरप्रायजेस सोलर ऑफीसमध्ये ऑफीस कामाकरिता १ मुलगी आणि १ मुलगा पाहिजे. शिक्षण कमीत कमी १२ वी पास किंवा पदवीधर पाहिजे. मो.नं. ८४८३९९९२२९

● Driver पाहिजे ८०८७५७२७४७

● नामांकित खाद्य तेल कंपनीत सेल्समन आवश्यकता आहे. स्वतःची टूव्हीलर आवश्यक मोबाईल - ९४२२६९११४७

● पाहिजेत- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी - १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह. विविध शाखांसाठी Home Revise Education Pvt.Ltd. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors / Sales Executive-20, Franchise-20, Telecaller-03. **Contact :** 8419940004 / 9372071769

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**स्थानिक नागरिकांकडून संताप | बोकडवीरा पुलाखाली अपघाताचा धोका**

# उरण-पनवेल मार्गावर खड्डे

**। उरण । प्रतिनिधी ।**

बोकडवीरा, नवीन शेवा आणि द्रोणागिरी नोडला जोडणाऱ्या उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. हे खड्डे चुकविण्यासाठी चारचाकी आणि दुचाकी वाहनांकडून रस्त्याच्या विरुद्ध दिशेने होणाऱ्या प्रवासामुळे येथे अपघाताची भीती वाढली आहे. या खड्ड्यांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

पहाटे रस्ते मोकळे असल्याने येणारी वाहने अतिवेगात चालवली जातात. नेहमी रहदारी नसणाऱ्या चालकांना या खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने या ठिकाणी वाहने आदळण्याची मोठी शक्यता असते. गेल्या काही दिवसांत या ठिकाणी चारचाकी वाहनांचे अपघात वाढले आहेत. उरण शहर ते जेएनपीटी कामगार वसाहत हा ६ किलोमीटर लांबीचा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होता.

बोकडवीरा पोलीस चौकी ते जेएनपीटी कामगार वसाहत हा मार्ग सिडकोकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. तर उरण शहर ते बोकडवीरा चौकी हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे.या मार्गाच्या रुंदीकरणाचे काम सध्या सुरू आहे. हे रुंदीकरणाचे काम या उड्डाणपुलापर्यंत आहे. या मार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी हे खड्डे आहेत. याचा फटका येथील प्रवाशांना बसत आहे.

> **सिडकोकडून दुरुस्ती**
> उरण - पनवेल मार्गावरील बोकडवीरा पोलीस चौकी ते जेएनपीटी कामगार वसाहत दरम्यानच्या मार्गाच्या दुरवस्थेची दखल घेत सिडकोने या मार्गातील खड्डे काही प्रमाण बुजवून मार्गाची दुरुस्ती केली आहे. मात्र तरीही बोकडवीरा चौकी ते बोकडवीरा या दरम्यानच्या मार्गावर खड्डे आहेत. या खड्ड्यांतून प्रवासी आणि वाहनचालकांना प्रवास करावा लागत आहे. दुरुस्तीमुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांना खड्डे आणि धुळीपासून दिलासा मिळाला आहे.

> **“या मागार्वर धुळीचे साम्राज्य पसरल्याने बोकडवीरा उड्डाणपुलाखालून प्रवास करणाऱ्या तसेच उरण शहरात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या मार्गाची तातडीने दुरुस्ती करावी.”**
> **- राजाराम पाटील, स्थानिक**

# विद्यालयात मोफत कराटे प्रशिक्षणाचा शुभारंभ



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महिला व बाल कल्याण विभाग अलिबाग रायगड यांच्या विद्यमाने मुलींसाठी स्वसंरक्षण व शारीरिक विकासासाठी आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात मोफत कराटे प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.

मुलींसाठी सुरू करण्यात आलेल्या कराटे प्रशिक्षणात विद्यार्थिनींमध्ये स्वसंरक्षण, आत्मविश्वास आणि शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.या प्रशिक्षणाचे उद्घाटन एशियन गोल्ड मॅडलिस्ट गोपाळ म्हात्रे, ४ वेळा नॅशनल गोल्ड मेडल प्राप्त परेश पावसकर, प्राचार्य सुभाष ठाकुर, संगीता म्हात्रे या मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवास गावंड यांनी केले. तर शेखर म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुंबई अदानी, लोढा, कंभोजची आहे का?

## खा. वर्षा गायकवाड यांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी ।

माजी मंत्री व काँग्रेस आ. अस्लम शेख यांना भाजपाचे अमित साटम नाहक बदनाम करत आहेत. हिंदू-मुस्लीम वाद उपस्थित करून राजकीय पोळी भाजण्याचा भाजपाचा हा डाव आहे. पण, मुंबईकर मात्र भाजपाचा कुटील डाव ओळखून आहेत. काँग्रेस आ. अस्लम शेख हे मालवणीतील गरिबांचा आवाज आहेत. अमित साटम यांनी मंगलप्रभात लोढांसाठी अस्लम शेख यांना पोकळ धमक्या देण्याचे थांबवावे आणि टॉवर बांधताना मंगलप्रभात लोढा यांनी किती मंदिरे उद्ध्वस्त केली, याचे उत्तर द्यावे, असे खडसावून, मुंबई ही काही फक्त अदानी, लोढा व कंभोजची नाही, असा इशारा मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.



मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अमित साटम यांच्या संदर्भात बोलताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या की, ज्या मालवणी पॅटर्नच्या नावाने आपण कंठशोष करत आहात, तो मालवणी पॅटर्न काय आहे, हे आधी समजून घ्या. ज्या लोढांसाठी आपण आमदार अस्लम शेख यांना पोकळ धमक्या देत आहात, ते अस्लम शेख मालवणी पॅटर्नचे उद्गाते आहेत. हिंदू-मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, बौद्ध अशा सर्व जाती धर्मांचे नागरिक जेथे गुण्यागोविंदाने नांदतात तो मालवणी पॅटर्न आहे. त्याउलट एका विशिष्ट समाजाला सोडून मुंबईतील मूळ भूमीपुत्रांनासुद्धा लोढा टॉवर्समध्ये घरे नाकारली जातात. मंगलप्रभात लोढा मालवणीतील गोरगरीबांच्या डोक्यावरचे छत्र हिरावून घेत आहेत. लोढा यांनी अंबोजवाडीत भर पावसात गोरगरीबांचे संसार उघड्यावर आणले होते. भाटी गावची हिंदू स्मशानभूमी मंगलप्रभात लोढा यांनीच तोडली. राठोडीतील हिंदूंना नोटीस न बजावता उघड्यावर आणणारे हेच मंगलप्रभात लोढा आहेत. आज हेच लोढा मालवणीतील सामाजिक ऐक्य संपवण्याचे काम करत आहेत. याविरोधात मालवणी पॅटर्न धर्मनिरपेक्षतेची मशाल तेवत ठेवत आहे आणि भाजपा व अमित साटम बांगलादेशी, रोहिंग्यांचा मुद्दा काढुन मालवणीतील हिंदूंना बेघर करत आहेत असा गंभीर आरोप खा. वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

मुंबई महानगरपालिकेत प्रशासकाच्या मदतीने भाजपा महायुतीचेच सरकार आहे, राज्यात त्यांचेच सरकार असून मुंबईकरांच्या कष्टाच्या पैशांची लुट केली जात आहे. मुंबईकरांना भेडसावणाऱ्या मुलभूत प्रश्नांवर निवडणुका लढल्या पाहिजेत पण मुंबईकरांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी अमित साटमसारखे भाजपाचे लोक हिंदू मुस्लीम वाद निर्माण करत आहेत पण त्यांचा हा कुटील डाव मुंबईकर हाणून पाडतील, असे शेवटी बोलताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.

## शिवसेनेचे चेतन चव्हाण भाजपात

**तळा :** शिवसेना शिंदेगटाचे तळा तालुका सहसंपर्क प्रमुख ॲड. चेतन चव्हाण यांनी भाजप खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. ॲड. चेतन चव्हाण यांनी नगरसेवक म्हणून निवडून येत शिवसेनेचे गटनेते म्हणून प्रमुख भूमिका बजावली होती. तसेच पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. मात्र मध्यंतरी घडलेल्या विविध घडामोडींमुळे ते पक्षापासून दुरावले होते. तसेच पक्षात घुसमट होत असल्यामुळे गेल्या काही वर्षांपासून ते पक्षाच्या विविध कार्यक्रमापासून अलिप्त होते. अखेर त्यांनी आपल्या शिवसेना सहसंपर्क प्रमुख पदाचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश केला.

## आ. अस्लम साटमांच्या कार्यालयावर काँग्रेसची धडक

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी काँग्रेस आमदार, माजी मंत्री अस्लम शेख यांच्याबद्दल अत्यंत खालच्या पातळीवरची भाषा वापरली होती. याविरोधात मुंबई युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत आमदार अमित साटम यांच्या अंधेरी येथील कार्यालयावर धडक दिली. यावेळी साटम यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

अस्लम शेख यांच्याबद्दल गरळ ओकणाऱ्या अमित साटम यांच्यावर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. मुंबई युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अखिलेश यादव, हरगून सिंह, विक्रम सिंह, फहीम शेख, जिल्हा अध्यक्ष भावना जैन यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी यात भाग घेतला. यावेळी पोलीसांनी दडपशाही करत तरुणांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. बळाचा वापर करत पोलीसांनी या सर्वांना ताब्यात घेतले. मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षाताई गायकवाड यांना पोलिसांच्या दडपशाहीची माहिती मिळताच त्या बांद्रा हिल रोड पोलीस स्टेशनमध्ये पोहोचल्या.

भाजपाचे नेते व कार्यकर्त्यांवर पोलीस कारवाई करत नाहीत पण विरोधकांवर मात्र कारवाईच्या नावाखाली दंडेलशाही करतात. भाजपा कार्यकर्त्यांना मोकाट सोडून पोलिसांनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यावर कारवाई केल्याचा आरोप आहे.

## 'श्रवण केल्याने आयुष्याचे कल्याणच होते'

। रोहा । प्रतिनिधी ।

तालुक्यातील मांदाड येथे पंचविसव्या श्री काडसिद्धेश्वर महाराज सांप्रदायिक सत्संग सोहळा दि.२२ नोव्हेंबर रोजी श्री लक्ष्मी नारायण मंदिराच्या सभागृहात दर्शन व अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी रायगड जिल्ह्यातील असंख्य भक्तगण परमपूज्य कणेरी मठाचे मठाधिपती अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामींच्या मुखातून अमृतमय वाणीतून येणारे विचार ऐकण्यासाठी उपस्थित होते. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामींचे आगमन होताच टाळ मृदुंगांच्या तालावर भजनाचे सूर लावून रायगड समितीने जोरदार स्वागत केले. तो सोहळा पाहण्यासारखा होता.

यंदाचा सत्संग सोहळा रौप्य महोत्सवी असल्यामुळे एक वेगळा आनंद या सोहळ्यास प्राप्त झाले होते. जेमतेम दहा ते बारा गुरुबंधू असलेल्या या गावात गेली पंचवीस वर्षे निरंतर परमपूज्य अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज कोल्हापूर येथून प्रवचनातून प्रबोधन करण्यासाठी येत असतात. अविरत चालू असलेल्या या सत्संग सोहळ्याच्या निमित्ताने आपल्या अनमोल वाणीच्या प्रवचनातून आशीर्वाद देत श्रवण केल्याने कोणते फायदे होऊ शकतात हे पटवून दिले.

मांदाड येथील काडसिद्धेश्वर महाराज सांप्रदायिक मंडळाने उत्तम कार्यक्रमाचे आयोजन करुन पंचविसव्या अध्यात्मिक सत्संग सोहळ्यात जराही कमतरता न दाखवता सांप्रदायातील आलेल्या भक्तगणांची सेवा मांदाड सांप्रदायिक मंडळाने करुन आरती भजन व त्यानंतर शेजारती करण्यात आली. शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## एसकेएम फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांचा गौरव

। चिरनेर । प्रतिनिधी ।

परभणी येथील एस.के.एम फाऊंडेशन संस्थेतर्फे रुद्रांश करिअर अकॅडमी जेएनपीटी, उरण यांच्या विद्यार्थांची आगामी येणारी पोलीस भरती, सैन्य भरती तसेच लेखी चाचणी व शारीरिक फिटनेस परीक्षा घेतली असता, पहिल्या तीन क्रमांकांच्या मानकरी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



याप्रसंगी भारत कांस्यपदकाचे मानकरी हरेश्वर ठाकूर उपस्थित होते. यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शन वेळेचे नियोजन असावे, २४ तासांमधून शरीरासाठी प्रात्यक्षिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी समजावून सांगितले. मानसिक ताणतणाव दूर करण्यासाठी मनात साठवणूक ठेवणे हे योग्य नाही तसेच शारीरिक ताणतणावाबाबत विद्यार्थ्यांना योगा, जिम, चालणे किंवा महत्त्वाचे धावणे याबाबत मार्गदर्शन केले. प्रशांत जेना तसेच अनुजेना मॅडम यांनी भगवद्गीतामधील काही उदाहरणे देऊन मैदान कसे लढवायचं ह्याबाबत सांगितलं. सोनल तांडेल ह्यांनी त्यांच्या रायगड जिल्हास्तरीय कराटे चॅम्पियन बाबत विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असणे आवश्यक आहे, स्ट्रेचिंगबाबत महत्त्वाच्या टिप्स दिल्या. महाराष्ट्र पोलीस आकाश धोके यांनी पोलीस भरतीमध्ये कशी तयारी करावी, नियोजन कसे करावे, अभ्यास किती तास असावा, मैदानाची तयारी केल्यानंतर डेली डायट कसा असावा, कोणती पुस्तकं वाचावी याबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमात प्रथम, द्वितीय आणि उत्कृष्ट पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. यात साक्षी (प्रथम), वनिता आटपाडकर (द्वितीय) क्रमांकच्या मानकरी ठरल्या, तसेच ऋषिकेश कोळी, माया पायल रोशन व करण उत्कृष्ट पारितोषिकाचे मानकरी ठरले. त्यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी राजेश म्हात्रे नागरी संरक्षण दल पेण तालुका हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राणी वडगावकर (सचिव), राहुल डाके (उपाध्यक्ष), विठ्ठल फड, अनिकेत गीते, सुग्रीम प्रजापति, ऋषिकेश गरकर यांनी केले होते. आभार प्रदर्शन करत असताना संस्थापिका गुंजन निषाद त्यांनी व्यासपीठासोबत मुलांचे हे कौतुक केले.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

वाचकांसाठी निवेदन
कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

## गणेश शिर्केंचा उपोषणाचा इशारा

। आपटा । प्रतिनिधी ।

लाडीवली येथील गणेश पांडुरंग शिर्के हे लोना इंडस्ट्रीज लि. लाडीवली या कंपनीत गेली १७ वर्षांपासून प्रोडक्शन विभागात काम करत आहेत. त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्यामुळे आठवड्यातून दोन वेळा डायलिसिसला जावे लागत आहे. याबाबत कंपनी व्यवस्थापन व कारखाने निरीक्षक रायगड यांना तोंडी व लेखी पत्र पाठवून वैद्यकीय मदत मागितली असून कोणतीही मदत मिळाली नाही. याविरोधात पांडुरंग शिर्के यांनी कंपनीच्या गेटसमोर बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे. सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी ते उपोषणास बसणार आहेत.

## रसायनीत निष्ठावंत कार्यकर्त्यांची घुसमट

### संधीसाधूंच्या गर्दीत सच्च्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष

। रसायनी । प्रतिनिधी ।

राजकारणात एकेकाळी निष्ठेला अनन्यसाधारण महत्त्व होते. तो काळ असा होता की, केवळ पक्षाच्या विचारधारेवर आणि आपल्या आवडत्या नेत्यावरील प्रेमापोटी कार्यकर्ते स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन काम करायचे. विशेष म्हणजे, पक्षाला आणि नेत्यालाही या त्यागाची आणि कष्टाची जाण असायची. आपला कोणताही कार्यकर्ता नाराज, होणार नाही, याची विशेष काळजी नेत्यांकडून घेतली जात असे. याच आपुलकीपोटी कार्यकर्ता निष्ठेने पक्षाचे काम करत असे.

मात्र, सध्याच्या काळात हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. आजही असे अनेक कार्यकर्ते आहेत, ज्यांनी कोणताही वैयक्तिक स्वार्थ मनात न ठेवता पक्षाचे हित सर्वोच्च मानून काम केले आहे. पण, केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी, पैशासाठी आणि आपली पोळी भाजन घेण्यासाठी पक्षांतरे करणाऱ्यांची गर्दी वाढली आहे. या आयाराम-गयारामांमुळे निष्ठेने काम करणारा मूळ कार्यकर्ता मात्र मागे पडत चालला असल्याची प्रचिती रसायनीत दिसत आहे.

दुर्दैवाने, आज खरा कार्यकर्ता उपेक्षित राहत आहे. स्थानिक नेत्यांच्यात वावरणारे, केवळ त्यांची जी हुजरेगिरी आणि वाहवा करणारे कार्यकर्तेच सध्या पुढे जाताना दिसत आहेत. सर्वच कार्यकर्ते पक्षात केवळ आर्थिक लाभासाठी आलेले नसतात. समाजासाठी, पुढील पिढीसाठी आणि पक्षासाठी काहीतरी ठोस, चांगले काम करण्याची त्यांची प्रामाणिक इच्छा असते असे रसायनी तील एका निष्ठावंत कार्यकर्त्यांने बोलून दाखवले.

ही परिस्थिती सर्वच राजकीय पक्षांनी गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. पक्षाचा कणा असलेला सच्चा कार्यकर्ता जर दुखावला गेला, तर भविष्यात पक्षाला मोठ्या अडचणींचा (समस्यांचा) सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पक्षांनी वेळीच आत्मपरीक्षण करून निष्ठावंतांना बळ देणे आवश्यक आहे.

## विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून आज सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ, बालक व महिला अत्याचार कायदे संबंधित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनी नितीन ठाकरे, सपोनि प्रवीण फडतरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील मायनॉरिटी उर्दू व इंग्लिश स्कूल, पनवेल या ठिकाणी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम, महिला व बालक लैंगिक अत्याचार संबंधित कायदे, अतिमोबाईल वापराचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी मायनॉरिटी उर्दू व इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व १०० ते १२५ विद्यार्थी उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे **सांगवी** ता. कर्जत जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील सचिन भिमा बोधणे हे अनिल हरिचंद्र खन्ना या विद्यमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे

मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १४/१/अ | ०-५१-५० गुंठे | ०-८७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारसहक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२४/११/२०२५
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु.पो.कोंदीवडे ता.कर्जत
जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक श्री. शरद बाबाजी वर्तक यांचे नावे सातबारा अभिलेखामध्ये दर्शविण्यात आलेले क्षेत्रापैकी आमचे अशिलांच्या मालकीच्या मिळकती लगतचे ०-०२-८० हे. आर. क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ५८६ | ४ | ०-२१-०० | ६.५३ |

सदर मिळकतीमधील श्री. शरद बाबाजी वर्तक यांचे नाव सातबारा अभिलेखात दर्शविण्यात आलेले क्षेत्र ०-१३-१० हे. आर., पो.ख. ०-०२-८० हे. आर., आकार रू. ४-७० पै. पैकी आमचे अशिलांच्या मालकीच्या नागाव भूमापन क्रमांक ५८६, उपविभाग ३ या मिळकतीचे लगत दक्षिण दिशेकडील सुमारे ०-०२-८० हे. आर क्षेत्राची बागायती मिळकत

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-२३/११/२०२५

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
''गुरूकृपा अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## मालेगावच्या घटनेचा जनवादी महिला संघटनेकडून निषेध

। उरण । प्रतिनिधी ।

मालेगाव येथील बालिकेवरील हत्तेचा अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने तीव्र निषेध केला आहे. या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त करत घडलेल्या घटनेचा निषेध केला आहे.

आपल्या भावना व्यक्त करताना महिला पदाधिकारी म्हणाल्या की, महाराष्ट्रात महिला आणि लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांच्या वाढत्या घटनांबाबत अखिल भारतीय जनवादी महिला संघटना गंभीर चिंता व्यक्त करीत आहे. नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात एका नराधमाने साडेतीन वर्षाच्या मुलीवर अत्याचार करून तिला ठार मारले. मुलीच्या वडिलांशी असलेल्या वैमनस्यातून सूड बुद्धीने त्याने हे भयानक कृत्य केल्याचे समजते.

इतक्या सहजपणे आरोपी एका कोवळ्या बालिकेवर इतका भयानक अत्याचार करू धजतो, याचा अर्थ गुन्हेगारांना पोलिस, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेची जराही भीती उरलेली नाही, हे स्पष्ट आहे. हे वास्तव अत्यंत गंभीर आहे. या घटनेतील आरोपीची लवकरात लवकर चौकशी करून त्याला कायद्याप्रमाणे कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी आग्रही मागणी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेले केली आहे.

दरम्यान, जनवादी महिला संघटनेच्या राज्य उपाध्यक्षा हेमलता पाटिल, अध्यक्षा सविता पाटील, सेक्रेटरी धनवंती भगत, खजिनदार लता पाटील, प्रमिला म्हात्रे, गीता पाटील, नयना म्हात्रे, उषा म्हात्रे, धनवंती भगत, कुंदा पाटील, रजनी पाटील, करूणा घरत, शारदा ठाकूर, माई ठाकूर, अपर्णा म्हात्रे, जयवंती पाटील, जयश्री माळी आदी महिला पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मालेगावमधील लहान मुलीवर झालेल्या अत्याचाराचा निषेध केला आहे.

## महायुतीच्या विकृत राजकारणाला मूठमाती द्या : सपकाळ

। मुंबई । प्रतिनिधी ।

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात गुंडगिरी, दंडेलशाही करण्यात आली. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी विरोधी पक्षांच्या उमेदवारांची कॉलर पकडणे, डांबून ठेवणे, दमदाटी करणे हे प्रकार सर्रास करण्यात आले आहेत. बिहारमध्ये जंगलराज आहे असा आरोप करणाऱ्या भाजपा महायुतीचा महाराष्ट्रात नंगानाच सुरु असून, त्यांनी लोकशाहीला काळीमा फासला आहे. महायुतीच्या या गुंडगिरी, भ्रष्टाचार व विकृत राजकारणाला मूठमाती द्या, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या प्रचारावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बीडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, बीड जिल्ह्यात सत्ताधारी पक्षाने उच्छाद मांडला आहे, त्यांच्या गुंडगिरीने बीड जिल्ह्याचे नाव बदनाम झाले आहे, ही विकृत्ती आता थांबवली पाहिजे. काँग्रेस पक्ष या निवडणुकीत ताकदीने लढत आहे. तर महायुतीमधील पक्षच आपापसात लढत आहेत. गँग्ज ऑफ ट्रिपल इंजिन सरकारमध्ये टोळीयुद्ध सुरु असून जनतेमध्ये सत्ताधारी महायुतीविरोधात प्रचंड रोष आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये निवडणुकीसाठी उत्साह असून बीड सह मराठवाड्यातही काँग्रेस पक्षाची कामगिरी चांगली होईल, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

यावेळी माजी मंत्री अशोक पाटील, माजी आमदार व परभणी जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष, माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनावणे, प्रदेश सचिव आदित्य पाटील, शहराध्यक्ष बहादूर भाई, तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे, प्रकाश देशमुख आदी उपस्थित होते.

## मतदारयाद्यांतील त्रुटी तातडीने दुरुस्त करा

### पनवेलच्या स्त्री शक्ती फाऊंडेशनची मागणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रकाशित याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी स्पष्टपणे दिसून येत आहेत. एका प्रभागातील नागरिकांची नावे दुसऱ्या प्रभागात टाकली गेली आहेत, काही वसाहतीतील रहिवाशांना पूर्णपणे वेगळ्या कॉलनीमध्ये दाखवले आहे, तसेच एकाच कुटुंबातील सदस्यांना वेगवेगळ्या प्रभागांमध्ये विभागले गेले आहे. मोठ्या संख्येने नागरिकांची नावे याद्यांतून वगळली गेली असून, उपलब्ध याद्यांमध्ये कोणतीही एकसूत्रता किंवा अचूकता जाणवत नाही. मतदारांचे एक प्रकारे स्थलांतर मनानेच निवडणूक विभागाने केल्याचे आढळून आले आहे.

या सर्व त्रुटींचा सरळ परिणाम नागरिकांच्या मतदानाधिकारावर होणार आहे. चुकीच्या प्रभागात नाव नोंदवल्यामुळे संबंधित नागरिकांना योग्य मतदान केंद्र मिळणार नाही आणि इच्छूक असूनही मतदान करता येणार नाही, अशी स्थिती निर्माण होऊ शकते. यातून मतदानाचा टक्का घटण्याची शक्यता आहे, ज्याचा थेट परिणाम संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर व विश्वासार्हतेवर होईल. निवडणूक विभागात मनुष्यबळाची कमतरता असल्याची माहिती मिळत असून, त्याचाच परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणात चुका झाल्याचे जाणवते. या पार्श्वभूमीवर स्त्री शक्ती फाऊंडेशनतर्फे आयुक्त मंगेश चितळे यांना विनंती करण्यात येते की, सर्व मतदार याद्यांचे संपूर्ण पुनर्समीक्षण करावे आणि चुकीची सर्व नोंदी तातडीने दुरुस्त कराव्यात. नागरिकांची नावे त्यांच्या मूळ प्रभागात योग्यरित्या समाविष्ट करावीत, वगळलेली नावे पडताळणी करून पुन्हा नोंदवावीत, तसेच एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे योग्य प्रभागात एकत्र ठेवण्याची काळजी घ्यावी.

नागरिकांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र आणि कार्यक्षम सहाय्य कक्ष सुरू करून तातडीने प्रत्यक्ष मदत उपलब्ध करून द्यावी. दुरुस्ती प्रक्रियेत विलंब होऊ नये म्हणून आवश्यक ते मनुष्यबळ तत्काळ नियुक्त करावे. यासंदर्भात हरकती नोंदवा असे आवाहन आपल्याकडून करण्यात आले असले अनेक चुका झाल्यामुळे किती हरकत ये नोंदवायच्या हा सुद्धा आमच्यासमोर प्रश्न आहे. मतदार यादी ही निवडणुकीतील अत्यंत महत्त्वाची कडी आहे.

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

ई निविदा सूचना क्रमांक ६४/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पनवेल येथील खांदा कॉलनीतील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती खांदा कॉलनीतील परिसरातील पथदिव्यांची, एलईडी फ्लड लाईट्स व ट्रान्सफॉर्मरची दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल दुरूस्ती करणे. (दुसरी मागणी) | रु १२,२८,७२९.०० |
| २ | पेण अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अलिबाग येथील महामंडळाच्या कार्यालयात मेकॅनिकल मोबाईल कॉम्पॅक्टर स्टोरेज सिस्टमचा पुरवठा करून बसविणे. (दुसरी मागणी) | रु ३७,८२,०४१.०० |
| ३ | पेण अलिबाग व नागोठाणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...पाणीपुरवठा योजनांसाठी कारखाने कायदा १९४८ नुसार आवश्यक परवाने काढणे. (तिसरी मागणी) | रु १५,२५,०००.०० |

उपरोक्त अ.क्र. १ व २ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २५/११/२०२५ ते दिनांक ०४/१२/२०२५ पर्यंत व अ.क्र. ३ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २५/११/२०२५ ते दिनांक ०१/१२/२०२५ पर्यंत : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २६/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण/महामंडळाचा खुलासा दिनांक २७/११/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## महिला दृष्टीहीन क्रिकेट टी २० वर्ल्ड कप

# भारत विश्वविजेता



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**वूमन्स टीम इंडियाने अवघ्या काही दिवसांपूर्वी दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत वनडे वर्ल्ड कप ट्रॉफीवर नाव कोरलं होतं. त्यानंतर आता अवघ्या काही दिवसांनी भारताच्या मुलींनी इतिहास रचला आहे. भारतीय दृष्टीहीन महिला संघाने टी २० वर्ल्ड कप जिंकला आहे. वूमन्स इंडियाने अंतिम सामन्यात नेपाळचा ७ विकेट्सने धुव्वा उडवत वर्ल्ड कप ट्रॉफी मिळवली. भारतीय संघाने या स्पर्धेत जशी सुरुवात केली होती तसाच शेवटही केला. भारतीय संघ संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राहिला. भारताच्या या कामगिरीनंतर सर्वच स्तरातून वर्ल्ड चॅम्पियन खेळाडूंचं अभिनंदन केलं जात आहे.**

महाअंतिम सामन्यातील पहिलाच अर्थात नाणेफेकीचा कौल भारताच्या बाजूने लागला. भारतीय कर्णधाराने नेपाळला बॅटिंगसाठी भाग पाडलं. भारतीय गोलंदाजांनी हा निर्णय योग्य ठरवला. भारतीय गोलंदाजांनी नेपाळला ६ च्या रनरेटनेही धावा करुन दिल्या नाहीत. भारताने नेपाळला २० ओव्हरमध्ये ५ झटके देत ११४ धावांवर रोखलं. नेपाळसाठी सरिता घिमिरे आणि बिमला राय या दोघींनी सर्वाधिक धावांचं योगदान दिलं. सरिताने ३५ तर बिमलाने २६ धावांचं योगदान दिलं. या दोघींव्यतिरिक्त एकीलाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. टीम इंडियासाठी जमुनी राणी टुडू आणि अनु कुमारी या दोघींनी प्रत्येकी १-१ विकेट मिळवली.

त्यानंतर भारताने ११५ धावांचं आव्हान सहज पूर्ण करत एकतर्फी विजय मिळवला. भारताने हे आव्हान ४७ बॉलआधी आणि ३ विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केलं. भारताने १२.१ ओव्हरमध्येच विजय साकारला. भारताला विजयी करण्यात फुला सरेन आणि करुणा के या दोघींनी बॅटिंगने प्रमुख योगदान दिलं. फुलाने २७ बॉलमध्ये नॉट आऊट ४४ रन्स केल्या. तर करुणा के हीने २७ चेंडूंमध्ये ४२ धावा केल्या. तसेच बसंती हांसदा हीने नाबाद १३ धावा करत भारताला वर्ल्ड कप ट्रॉफीपर्यंत पोहचवण्यात मदत केली. भारताने ऑस्ट्रेलियानंतर नेपाळवर ८५ धावांनी मात केली. अमेरिकेवर भारताने १० विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला या स्पर्धे तही त्यांची जागा दाखवून दिली. भारताने पाकिस्तानवर ९ विकेट्सने विजय साकारला. त्यानंतर भारतासमोर उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचं आव्हान होतं. भारताने ऑस्ट्रेलियावर ९ विकेट्सने विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली होती.



### भारताचा सलग सातवा विजय

दरम्यान टीम इंडिया या स्पर्धेत अजिंक्य राहिली. भारताने या स्पर्धेतील एकही क्रिकेट सामना गमावला नाही. या स्पर्धेत एकाही संघाला भारताला पराभूत करता आलं नाही. भारताने श्रीलंकेचा १० विकेट्सने धुव्वा उडवत स्पर्धेत विजयी सलामी दिली होती. त्यानंतर भारताने कांगारुंवर २०० पेक्षा अधिक धावांच्या फरकाने मात केली. भारताने ऑस्ट्रेलियावर २०९ धावांनी विजय साकारला.

## दक्षिण आफ्रिकेविरुद्धची एकदिवसीय मालिका

# राहुलकडे भारतीय संघाचे नेतृत्व

| मुंबई | वृत्तसंस्था |

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. दुखापतग्रस्त कर्णधार शुभमन गिल, अष्टपैलू हार्दिक पंड्या आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर बाहेर आहेत. एकदिवसीय मालिकेत यष्टीरक्षक केएल राहुल संघाचे नेतृत्व करेल. रोहित शर्मा आणि विराट कोहली जवळजवळ नऊ महिन्यांनंतर भारतात आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना दिसतील. जसप्रीत बुमराहला विश्रांती देण्यात आली आहे. तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ३० नोव्हेंबरपासून सुरू होत आहे.

यष्टीरक्षक केएल राहुलने तिन्ही फॉरमॅटमध्ये भारताचे नेतृत्व केले आहे. त्याने शेवटचे २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात संघाचे नेतृत्व केले होते, जिथे भारताचा ८ गडी राखून पराभव झाला होता. त्याने १२ एकदिवसीय सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले आहे, ज्यामध्ये आठ जिंकले आहेत आणि चार गमावले आहेत.

भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात जखमी झाला. पहिल्या डावात स्वीप शॉट खेळताना त्याला मानेचा ताण जाणवला आणि त्यानंतर तो रिटायर्ड हर्ट झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तो क्रिकेट खेळण्यास अयोग्य असल्याचे आढळून आले. ऑक्टोबरमध्ये टीम इंडियाने एकदिवसीय आणि टी-२० सामने खेळण्यासाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा केला होता. एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात उपकर्णधार श्रेयस अय्यरला झेल घेण्याच्या प्रयत्नात दुखापत झाली. झेल घेताना तो त्याच्या खांद्यावर बसला, ज्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पुढील वर्षी मार्चपर्यंत तो क्रिकेटच्या मैदानावर परतण्याची शक्यता कमी आहे.

अष्टपैलू हार्दिक पंड्या आशिया कप दरम्यान जखमी झाला होता. या वर्षी सप्टेंबरमध्ये सुपर फोर स्टेज सामन्यादरम्यान त्याला ही दुखापत झाली होती. यामुळे तो २८ सप्टेंबर रोजी पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यात खेळू शकला नाही. तथापि, टीम इंडियाने हा सामना ५ विकेट्सने जिंकला आणि विजेतेपदावर नाव कोरले.

रोहित शर्मा आणि विराट कोहली जवळजवळ नऊ महिन्यांनंतर भारतात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतणार आहेत. त्यांनी शेवटचा सामना फेब्रुवारीमध्ये इंग्लंडविरुद्धच्या घरच्या मैदानावर झालेल्या एकदिवसीय मालिकेत खेळला होता. दुबईमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर, गेल्या महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत ते आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतले.

### भारताचा संघ

केएल राहुल (कर्णधार आणि यष्टिरक्षक), रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, विराट कोहली, तिलक वर्मा, ऋतुराज गायकवाड, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), नितीश रेड्डी, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग.

### दक्षिण आफ्रिका संघ

एकदिवसीय सामने: टेम्बा बावुमा (कर्णधार), ओटनील बार्टमन, कॉर्बिन बॉश, मॅथ्यू ब्रेट्झकी, देवाल्ड ब्रुविस, नांद्रे बर्गर, क्विंटन डी कॉक, टोनी डी जियोर्गी, रुबिन हर्मन, मार्को यान्सन, केशव महाराज, एडेन मार्कराम, लुंगी एनगिडी, रायन रिकेल्टन, प्रणॉय सुब्रायन.

## निवडक

### पाकिस्तानने केला श्रीलंकेचा पराभव

**रावळपिंडी :** तिरंगी मालिकेत पाकिस्तानने श्रीलंकेचा सात विकेट्सने पराभव करून पॉइंट टेबलमध्ये पहिले स्थान पटकावले. झिम्बाब्वे हा मालिकेतील तिसरा संघ आहे.रावळपिंडी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ७ बाद १२८ धावा केल्या. पाकिस्तानने हे लक्ष्य केवळ १५.३ षटकांत ३ गडी गमावून पूर्ण केले. श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु हा निर्णय अयशस्वी ठरला. त्यांच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. कामिल मिश्राने त्याच्या पहिल्या ११ चेंडूत २२ धावा केल्या, पण चौथ्या षटकात, त्याने फहीम अश्रफच्या हळू चेंडूचा चुकीचा अंदाज घेतला आणि झेलबाद झाला. पॉवरप्लेमध्ये श्रीलंकेला फक्त एक चौकार मारता आला. दरम्यान, कुसल मेंडिस देखील अनावश्यक दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात धावबाद झाला.पॉवरप्लेच्या शेवटी श्रीलंकेची धावसंख्या ४४/२ होती. जानिथ लियानागेने ३८ चेंडूत ४१ धावा केल्या, परंतु त्याच्या खेळीमुळे संघाला गती मिळाली नाही. पाकिस्तानच्या गोलंदाजांनी शानदार कामगिरी केली. मोहम्मद नवाजने चार षटके गोलंदाजी केली आणि फक्त १६ धावा देऊन तीन बळी घेतले. त्याचा इकॉनॉमी रेट फक्त चार होता. अबरार अहमद, फहीम अश्रफ आणि सलमान मिर्झा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. सलामीवीर सैम अयुब १८ चेंडूत २० धावा काढून बाद झाला आणि या दरम्यान त्याने आंतरराष्ट्रीय टी क्रिकेटमध्ये १००० धावाही पूर्ण केल्या.दुसरा सलामीवीर, साहिबजादा फरहान, याने शानदार फलंदाजी केली आणि ४५ चेंडूत नाबाद ८० धावा केल्या.

### ‘इराणसाठी सज्ज, विजेतेपद हेच ध्येय!’

**पुणे :** महिला कबड्डीतील वर्चस्व सिद्ध करण्यासाठी भारतीय संघ पूर्ण ताकदीने सज्ज आहे. तंत्र, कौशल्य आणि शारीरिक क्षमता या सर्व आघाड्यांवर भारतीय खेळाडू उत्तम कामगिरी करत आहेत. त्यामुळे आमचे ध्येय स्पष्ट आहे, ते म्हणजे विश्वचषक विश्वविजेतेपद! असा ठाम विश्वास भारतीय संघाच्या प्रशिक्षक तेजस्विनी यांनी व्यक्त केला.ढाका येथे सुरू असलेल्या महिलांच्या दुसऱ्या विश्वचषक कबड्डी स्पर्धेत भारतीय संघाच्या आतापर्यंतच्या कामगिरीबाबत प्रशिक्षक तेजस्विनी यांनी समाधान व्यक्त केले. साखळीत आम्हाला मोठे आव्हान नव्हते, पण आम्ही कोणत्याही प्रतिस्पर्ध्याला कमी लेखण्याची चूक केली नाही. पूर्ण तयारीने आम्ही खेळलो. खेळाडूंची अदलाबदल हा खेळाच्या नियोजनाचा भाग होता. प्रतिस्पर्धी संघाचा खेळ पाहून आम्ही त्यानुसार योजना आखल्या. इराणचेही सर्व सामने पाहिले असून, आम्ही उपांत्य फ रीत त्यांच्याविरोधात सर्वोत्तम कामगिरीसाठी सज्ज असू,असे तेजस्विनी यांनी सांगितले. भारतीय संघाच्या चढाया चांगल्या होत आहेत. दोन्ही कोपऱ्यांमध्ये आणि मध्यरक्षकांमध्ये उत्तम समन्वय असून त्यामुळे आम्ही वर्चस्व राखू यात शंका नाही. इराण सातत्याने प्रगती करत आहे, मात्र या वेळेस त्यांच्या चढाईपटूंच्या कामगिरीत सातत्याचा अभाव जाणवतो आणि बचावही कमकुवत दिसला आहे. अर्थात, आम्ही त्यांना कमी लेखणार नाही. पूर्ण क्षमतेनेच मैदानात उतरणार आहोत. सर्व खेळाडू तंदुरुस्त आहेत, हे सर्वात महत्त्वाचे,असेही तेजस्विनी म्हणाल्या.

### कसोटीत आफ्रिका ४८९ वर ऑलआऊट

**गुवाहाटी :** भारताविरुद्धच्या गुवाहाटी कसोटीच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेचा संघ ४८९ धावांवर ऑल आऊट झाला. दुसऱ्या दिवसाच्या खेळाअखेर भारताने बिनबाद ९ धावा केल्या होत्या. यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल नाबाद राहिले.शनिवारी बारसापारा स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. सेनुरन मुथुस्वामीने १०९ आणि मार्को जॅन्सेनने ९३ धावा केल्या. ट्रिस्टन स्टब्सने ४९ आणि कर्णधार टेम्बा बावुमाने ४१ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने चार बळी घेतले. जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या दिवशी सहा बाद २४७ धावा केल्या होत्या. तिसऱ्या दिवसाचा खेळ सोमवारी सकाळी ९ वाजता सुरू होईल.

# भारत-पाकिस्तान पुन्हा भिडणार

| अहमदाबाद | वृत्तसंस्था |

टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असतील. भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या या स्पर्धेत २० संघ सहभागी होतील. अंतिम सामना अहमदाबादमध्ये होण्याची शक्यता आहे. टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा पुढच्यावर्षी ७ फेब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान खेळवली जाणार आहे.

ही स्पर्धा भारत आणि श्रीलंका हे दोन देश मिळून आयोजित करणार आहेत. २०२४ प्रमाणेच २०२६ च्या टी वर्ल्ड कपमध्येही २० संघ सहभागी होणार असून स्पर्धेचे स्वरुपही सारखेच असणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणारे सर्व २० संघ निश्चित झाले आहेत. मुख्य स्पर्धेसाठी १२ संघ थेट पात्र ठरले होते, तर ८ संघांनी पात्रता स्पर्धा खेळून स्पर्धेचे तिकीट मिळवले आहे.

आधी या २० संघांत पहिली साखळी फेरी खेळवली जाणार आहे. या फेरीसाठी २० संघांची ४ गटात विभागणी होते. क्रिकबझच्या वृत्तानुसार आता ही गटवारी जवळपास निश्चित असून भारत आणि पाकिस्तान हे एकाच गटात असतील. ही गटवारी २५ नोव्हेंबरला मुंबईत जाहीर होऊ शकते. भारत आणि पाकिस्तान यांच्यासमोर सर्वात सोपा गट आहे. भारत आणि पाकिस्तानसह नेदरलँड, नामिबिया आणि अमेरिका हे एकाच गटात असतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यात कोलंबोमध्ये १५ फेब्रुवारीला सामना होण्याची शक्यता आहे. भारताचा पहिला सामना अमेरिकाविरुद्ध होईल.

## वर्ल्ड रॅपिड आणि ब्लिट्स स्पर्धा


# ड्रेस कोडमध्ये शिथिलता

### खेळाडूंना जीन्स परिधान करण्यास बुद्धिबळ महासंघाची परवानगी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पुढील महिन्यात दोहा येथे होणाऱ्या वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने पोषाखाबाबत शिथिलता दाखवली आणि नवा ड्रेस कोड जाहीर केला. गेल्या वर्षी याच स्पर्धेत मॅग्नस कार्लसनच्या जीन्सगेट वादानंतर या वेळी पुरुष आणि महिलांना आक्षेपार्ह नसलेल्या जीन्स परिधान करण्यास परवानगी दिली आहे.

ही बुद्धिबळ स्पर्धा २५ ते ३० डिसेंबरदरम्यान दोहा येथे होत आहे. त्यामध्ये आता पुरुष आणि महिला खेळाडू निळ्या, काळ्या किंवा करड्या रंगातील पारंपरिक जीन्स किंवा गडद रंगाचे कॅज्युअल ट्राउझर्स परिधान करू शकतील. पुरुषांसाठी



सूट, एकसंध रंगाचे शर्ट, बूट, लोफर्स आणि एका रंगाचे स्नीकर्स यांना परवानगी देण्यात आली आहे. महिलांसाठी स्कर्ट, पॅन्टसूट, ड्रेस, जीन्स किंवा डार्क ट्राउझर्स तसेच तत्सम फुटवेअर वापरण्याची मुभा आहे. वस्त्रे स्वच्छ, नीटनेटकी आणि न फाटलेली असावीत; कोणतेही आक्षेपार्ह घोषवाक्य किंवा प्रतिबंधित लोगो असलेले कपडे मान्य होणार नाहीत. टी-शर्ट, शॉर्ट्स, बेसबॉल कॅप आणि समुद्र किनाऱ्यावर परिधान करणाऱ्या कपड्यांवरील बंदी कायम आहे. १०१ वर्षे जुन्या या फिडेने यावर्षी सप्टेंबरमध्येच ड्रेस कोड शिथिल करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्यामागे गेल्या वर्षीचीच वादग्रस्त घटना कारणीभूत ठरल्याचे सांगितले जाते. फिडेने दोहा स्पर्धेसाठी ड्रेस कोडचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईचीही माहिती दिली आहे. अव्यवस्थित किंवा सुरकुत्या असलेले कपडे परिधान केल्यास दंड होऊ शकतो, तर वारंवार किंवा गंभीर उल्लंघन झाल्यास खेळाडूंना पुढील फेऱ्यांमधून वगळले जाऊ शकते. फिडने या ड्रेस कोडची घोषणा करण्याच्या आदल्या दिवशी दिग्गज खेळाडू मॅग्नस कार्लसनने गेल्या वर्षीच्या वादाची आठवण करून दिली.

गेल्या वर्षी कार्लसनने ड्रेस कोडचे उल्लंघन केले होते तो रॅपिड राउंडसाठी जीन्स परिधान करून उपस्थित राहिल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. त्याला २०० डॉलर दंड ठोठावण्यात आला आणि प्रशासकांनी इशारा दिला, तरीही त्याने त्वरित कपडे बदलण्यास नकार दिल्याने त्याला त्या दिवसाच्या सामन्यांतून वगळण्यात आले होते.

# सातारा पोलिसांची यशाची हॅट्ट्रिक

### कोल्हापूर परिक्षेत्रीय क्रीडा स्पर्धेत ९३ पदकांची कमाई, क्रीडा क्षेत्रात दबदबा कायम !

| सातारा | वृत्तसंस्था |

पुणे ग्रामीण (बारामती) येथे नुकत्याच पार पडलेल्या ५१ व्या कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धेत सातारा जिल्हा पोलिस दलाने दमदार कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. सर्वसाधारण विजेतेच्या पदाची हॅट्ट्रिक साधत पोलिस दलाने ऐतिहासिक यश मिळविले आहे.

जिल्हा पोलिस दलाच्या पुरुष संघाने वैयक्तिक क्रीडा प्रकारात तब्बल ५७ सुवर्ण, २३ रजत आणि १३ कांस्य अशा एकूण ९३ पदकांची कमाई केली. सांघिक क्रीडा प्रकारात व्हॉलिबॉल, खो-खो, क्रॉसकंट्रीत विजेतेपद तर फुटबॉलमध्ये उपविजेते आणि हॉकी



व हॅन्डबॉलमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. एकूण २०७ गुणांसह पुरुष गटाने पुरुष गटात सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

महिला संघाने वैयक्तिक क्रीडा प्रकारात ४६ सुवर्ण, २३ रजत व ८ कांस्य अशी एकूण ७७ पदके पटकावली. सांघिक स्पर्धांमध्ये कबड्डी विजेते, खो-खो व बास्केटबॉलमध्ये उपविजेते आणि व्हॉलिबॉल, क्रॉसकंट्री या प्रकारांमध्ये तृतीय स्थान मिळवले. एकूण १६४ गुणांसह महिला गटानेही सर्वसाधारण विजेतेपद मिळवत जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

या ऐतिहासिक कामगिरीबद्दल पोलिस अधीक्षक तुषार दोषी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, उपअधीक्षक अतुल सबनीस, पोलिस उपअधीक्षक सुनील साळुंखे, सहायक पोलिस निरीक्षक अभिजित यादव, राखीव पोलिस उपनिरीक्षक सुशील कदम राखीव पोलिस निरीक्षक अयोध्या घोरपडे यांनी पुरस्कार प्राप्त खेळाडू क्रीडा विभाग प्रमुख सुनील सपकाळ, सॅम्युअल भोरे व अन्य प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

## स्मृती आणि पलाश यांचे लग्न पुढे ढकलले

| इंदूर | वृत्तसंस्था |

महिला क्रिकेटपटू स्मृती मंधाना आणि संगीत दिग्दर्शक पलाश मुच्छल यांचे आज होणारे लग्न पुढे ढकलण्यात आले आहे. हा विवाह महाराष्ट्रातील सांगली येथे होणार होता, परंतु स्मृतीच्या वडिलांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे हा समारंभ पुढे ढकलण्यात आला आहे, असे स्मृतीचे व्यवस्थापक तुहिन मिश्रा यांनी सांगितले. वृत्तानुसार, शनिवारी रात्री सांगलीतील समडोली रोडवरील मंधाना फार्म हाऊसमध्ये मेहंदी आणि संगीत समारंभ आयोजित करण्यात आला होता. रविवारी दुपारी लग्नाच्या विधी सुरू होणार होत्या. त्याआधीच स्मृतीच्या वडिलांची प्रकृती अचानक बिघडली.

# पहिल्या ॲशेस कसोटीत ऑस्ट्रेलियाचा सनसनाटी विजय

| पर्थ | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यामध्ये सुरू झालेल्या ॲशेस कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाने अवघ्या दोन दिवसांत सनसनाटी विजय मिळवला आहे. गोलंदाजीला अनुकूल असलेल्या पर्थच्या खेळपट्टीवर दुसऱ्या डावात ट्रॅव्हिस हेडने टी-२० स्टाईलमध्ये ठोकलेल्या शतकाच्या जोरावर २०५ धावांच्या आव्हानाचा ऑस्ट्रेलियाने आठ गडी राखून सहज फडशा पाडला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने ॲशेस मालिकेत आघाडी मिळवली आहे.

सुरू झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने मिचेल स्टार्कच्या भेदक माऱ्याच्या जोरावर इंग्लंडचा डाव अवघ्या १७२ धावांत गुंडाळून जोरदार सुरुवात केली होती. मात्र त्यानंतर इंग्लंडचा कप्तान बेन स्टोक्स याने कांगारूंवर जोरदार प्रतिहल्ला करत ऑस्ट्रेलियाचा डाव अवघ्या १३२ धावांत गुंडाळला. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी पुन्हा एकदा टिच्चून मारा करत इंग्लंडचा दुसरा डाव अवघ्या १६४ धावांवर संपुष्टात आणला. हेड याने सुरुवातीपासूनच चौकार, षटकारांची बरसात करून इंग्लंडच्या गोलंदाजीवर दबाव आणला. त्याने अवघ्या ६९ चेंडूत शतक पूर्ण केले. यादरम्यान, हेडने वेथरल्डसोबत ७५ आणि लाबुशेनसोबत ११७ धावांची भागीदारी करत ऑस्ट्रेलियाला विजयाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले.

## फक्त ३८ मिनिटांत अंतिम फेरी जिंकली | जपानच्या युशी तनाकाला हरवले

# लक्ष्य सेन ऑस्ट्रेलियन ओपनचा विजेता

| सिडनी | वृत्तसंस्था |

भारतीय शटलर लक्ष्य सेनने रविवारी ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० चे विजेतेपद जिंकले. त्याने अंतिम सामन्यात जपानच्या युशी तनाकाचा २१-१५, २१-११ असा पराभव केला. लक्ष्यने सिडनी स्पोर्ट्स सेंटरमध्ये अवघ्या ३८ मिनिटांत सामना जिंकला आणि विजयानंतर कानांत बोटे धरून आनंद साजरा केला.

२४ वर्षीय लक्ष्य हा उत्तराखंडमधील अल्मोडा येथील रहिवासी आहे. पॅरिस ऑलिंपिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिल्यानंतर त्याला खराब फॉर्मचा सामना करावा लागला, परंतु या स्पर्धेत त्याने उल्लेखनीय पुनरागमन केले. त्याने उपांत्य फेरीत चायनीज तैपेईच्या चाउ तिएन चेनचा पराभव केला.

### २०२४ नंतरचे पहिले मोठे विजेतेपद

जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्यने शेवटचे २०२४ मध्ये लखनौ येथे सय्यद मोदी इंटरनॅशनल (सुपर ३००) जिंकले होते. त्यानंतर हे त्याचे पहिलेच मोठे सुपर ५०० विजेतेपद आहे. या वर्षी सप्टेंबरमध्ये तो हाँगकाँग सुपर ५०० च्या अंतिम फेरीतही पोहोचला होता, परंतु विजेतेपद जिंकण्यात त्याला अपयश आले.

### या हंगामात विजेतेपद जिंकणारा दुसरा भारतीय

या विजयासह, लक्ष्य या हंगामात वर्ल्ड टूर जेतेपद जिंकणारा दुसरा भारतीय ठरला. आयुष शेट्टीने यापूर्वी यूएस ओपन सुपर ३०० जिंकले होते. सात्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडी हाँगकाँग आणि चायना मास्टर्सच्या अंतिम फेरीत पोहोचली, तर किदाम्बी श्रीकांत मलेशिया मास्टर्समध्ये उपविजेता राहिला.

### तनाका विरुद्ध एकतर्फी विजय

यावर्षी ऑर्लीन्स मास्टर्स आणि यूएस ओपन (दोन्ही सुपर ३००) जिंकणाऱ्या जागतिक क्रमवारीत २६ व्या स्थानावर असलेल्या तनाकाविरुद्ध सेनने उत्कृष्ट नियंत्रण, अचूक स्थान आणि स्वच्छ खेळ दाखवला आणि सामना सरळ गेममध्ये संपवला. लक्ष्यने सुरुवातीपासूनच गती पकडली आणि ६-३ अशी आघाडी घेतली. तनाका नेट, बॅकलाइन आणि ओव्हरहिट शॉट्समध्ये चुका करत राहिला. ३५ शॉट्सची रॅली चुकीमुळे संपली. ब्रेकपर्यंत लक्ष्य ११-८ अशा आघाडीवर होता.

ब्रेकनंतर लक्ष्यचा खेळ पुन्हा मजबूत झाला. त्याच्या बॅकहँड स्मॅश आणि क्रॉस-कोर्ट विनरने त्याला १७-१३ अशी आघाडी मिळवून दिली. तनाकाच्या वारंवार चुकांमुळे लक्ष्यला पाच गेम पॉइंट मिळाले आणि त्याने पहिली संधी साधली.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)